७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# अंबा-कुंभे जलविद्युत प्रकल्प क्षमतावाढीसाठी करार

## दोन्ही प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये १८०० मे.वॅ. वरून २६०० मे.वॅ. वाढ होणार

मुंबई (दै. संध्या)

एनटीपीसी लिमिटेडच्या रायगड जिल्ह्यातील कुंभे व अंबा उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या स्थापित क्षमतावाढीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग आणि 'एनटीपीसी' यांच्यात सुधारित सामंजस्य करार करण्यात आला. या दोन्ही प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये १८०० मे.वॅ. वरून २६०० मे.वॅ. वाढ होणार आहे.

मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ, तापी आणि कोकण विकास पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, 'एनटीपीसी'चे विभागीय कार्यकारी संचालक (वेस्टन रिजन) ई सत्या फानी कुमार, महाप्रबंधक (हायड्रो) मनमीत बेदी, एनटीपीसीचे (हायड्रो इंजिनिअरिंग) सहायक महाप्रबंधक डॉ. अनुभव, हायड्रो इंजिनिअरिंगचे उप महाप्रबंधक डॉ. प्रशांत पांडे, डॉ. अरबिंद कुमार, अपर महाप्रबंधक सूर्य प्रकाश केसरवानी, अंबा पीएसपीचे सागर धांडे आदि उपस्थित होते. जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. कपूर व एनटीपीसीचे विभागीय कार्यकारी संचालक श्री. ई. सत्या फानी कुमार यांनी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी श्री. कपूर यांनी कराराची माहिती दिली. सार्वजनिक खाजगी भागीदारीव्दारे (PPP) उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसन करण्याचे धोरण दि.२० डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. आतापर्यंत ५९ सामंजस्य करार झाले आहेत. एनटीपीसी बरोबरचा हा राज्याचा एकूण ६० वा सामंजस्य करार आहे. या धोरणास अनुसरून ६० सामंजस्य करारांद्वारे ८२,०१५ मे.वॅ. वीज निर्मिती क्षमता अपेक्षित असून याव्दारे रु. ४.२८ लक्ष कोटी इतकी गुंतवणूक तर १.३१ लक्ष मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे. एनटीपीसी लिमिटेड यांनी रायगड जिल्ह्यातील अंबा व कुंभे या उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेमध्ये ८०० मे.वॅ. ने वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (CEA) मूळ सामंजस्य करारात सुधारणा करण्याची सूचना केली आहे. याअनुषंगाने एनटीपीसी लिमिटेड यांनी केलेली विनंती विचारात घेता मूळ सामंजस्य करारातील खालील नमूद उदंचन योजनांसाठी सुधारीत करार करण्यात आला.




## मच्छीमारांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक : नितेश राणे



मुंबई (दै. संध्या)

मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. मत्स्य व्यवसाय क्षेत्राला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेसह विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थीस देऊन त्याला अधिक सक्षम करण्यासाठी विभाग प्रयत्नशील असून मच्छीमारांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक असल्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या 'बल्क ग्राहक' डिझेल दर वर्गीकरणात बदल करून दिलासा देण्याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत राणे बोलत होते. यावेळी खासदार वर्षा गायकवाड, मत्स्य व्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार तसेच विविध मच्छीमार सहकारी संस्थांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राणे म्हणाले, महाराष्ट्रातील मच्छीमारांसमोरील विविध गंभीर प्रश्नांबाबत राज्य सरकार लवकरच सकारात्मक निर्णय घेईल, राज्यातील मच्छीमारांना 20 मार्च 2026 पासून बल्क कंझ्युमर श्रेणीत वर्ग करण्यात आल्यामुळे डिझेल दरात वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय मागे घेऊन मच्छीमारांना पूर्वीप्रमाणे अनुदानित दरात डिझेल उपलब्ध करून देण्याबाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकार सकारात्मक विचार करत आहे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




## चेतना पाटील यांचा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केला सत्कार

मुंबई (दै. संध्या)



■ ८ वर्षीय बालिकेला तासाभरात शोधून सुरक्षित पालकांकडे परत केल्याबद्दल गौरव

छत्रपती संभाजीनगर येथून कुटुंबासह मुंबईत पर्यटनासाठी आलेली आठ वर्षीय अनाबिया शेख हरवल्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनच्या महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने अवघ्या एका तासात बालिकेचा शोध घेऊन तिला सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात दिल्याबद्दल मंत्रालयात पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. मंत्रालयातील पर्यटन मंत्र्यांच्या दालनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील यांना प्रशस्तीप्रत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सारख्या अतिविशाल आणि गर्दीच्या रेल्वे स्थानकाच्या परिसरात ही घटना घडली होती. दररोज लाखो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या स्थानकात हरवलेल्या बालिकेचा अल्पावधीत शोध घेणे हे अत्यंत आव्हानात्मक काम होते. अशा परिस्थितीत चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने दाखवलेली तत्परता, समन्वय आणि सूक्ष्म तपास कौतुकास्पद ठरला आहे. पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, मुंबईत आलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी दाखविण्यात आलेली तत्परता आणि संवेदनशीलता ही अत्यंत प्रशंसनीय आहे. पर्यटकांचा सुरक्षिततेवरील विश्वास अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारचे कार्य महत्त्वपूर्ण असून चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने केलेली कामगिरी पोलीस दलासाठी प्रेरणादायी आहे. पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हरवलेल्या बालिकेचा अल्पावधीत शोध घेऊन सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात देणे ही जबाबदारीची उत्कृष्ट जाणीव दर्शवणारी बाब आहे. अशा उल्लेखनीय कार्याचा गौरव व्हावा यासाठी महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील यांच्या नावाची गृह राज्यमंत्री यांच्याकडे विशेष प्रशस्ती आणि गौरवासाठी शिफारस करण्यात येणार असल्याचे पर्यटन मंत्री देसाई यांनी सांगितले.

# कचरा डेपोमध्ये बांबू लागवड करून ग्रीन फॉरेस्ट क्षेत्र वाढवावे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : कांजूरमार्ग कचरा डेपोसंदर्भात बैठक

मुंबई (दै. संध्या)

■ दुर्गंधी रोखण्यासाठीची उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवावी

■ कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाची तातडीने कार्यवाही करावी



कांजूरमार्ग कचरा डेपोमुळे परिसरातील रहिवाशांना दुर्गंधीचा त्रास कमी व्हावा यासाठी दुर्गंधी रोखण्यासाठीची उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवावी. दुर्गंधी प्रतिरोधक फवारणी वाढवून त्याचे संनियंत्रण करण्यात यावे. कचरा डेपोमध्ये बांबूची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात यावी. रहिवासी भाग जवळ असलेल्या कचरा डेपोतील क्षेत्रात कचरा प्रक्रिया न करता ती लांब अंतरावर करण्यात यावी. यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. गोविंदराज, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते. तर मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि मुंबई महानगर परिसरातील महापालिकांचे आयुक्त दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

कांजूरमार्ग येथील महानगरपालिकेच्या कचरा प्रकल्पात दररोज सुमारे ६,२०० टन कचऱ्यावर प्रक्रिया होते. जमिनीत कचरा साठवणे, कंपोस्ट खत बनवणे आणि कचरा वर्गीकरण या तीन पद्धतींनी काम चालते. आतापर्यंत जवळपास १९० लाख मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आल्याचे शर्मा यांनी यावेळी सांगितले.

या भागात दुर्गंधी रोखण्यासाठी जैविक द्रावणाची (बायोएन्जाईम स्प्रे) फवारणी करणे, माती टाकणे, लॅण्ड फील गॅस मॅनेजमेंट यंत्रणा राबविणे, त्याचबरोबर मिस्टींग प्रक्रिया यासारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या भागात रहिवाशांना दुर्गंधीचा त्रास होता कामा नये त्यासाठी उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत त्याचे पालन करावे. दुर्गंधी प्रतिबंधक फवारणी अधिक प्रभावीपणे करण्यात यावी. बांबूची लागवड मोठ्या प्रमाणावर करून या भागात बांबूंचे घनदाट जंगल निर्माण करावे जेणेकरून दुर्गंधी रोखण्यासाठी त्याचा उपयोग होईल, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कचऱ्यापासून वीज निर्मिती (वेस्ट टू एनर्जी) यासारख्या दीर्घकालीन उपाययोजना प्रकल्पासाठी आवश्यक त्या तांत्रिक बाबी तपासून हा प्रकल्प तातडीने सुरू होईल, यासाठी मुंबई महापालिकेने पावले उचलावीत, असे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. रहिवासी भाग कचरा डेपोच्या ज्या क्षेत्राजवळ आहे तेथे खत, आरडीएफ अशा दुर्गंधी येणाऱ्या प्रक्रिया न करता त्या ५०० मीटरपेक्षा जास्त अंतरावरील भागात कराव्यात जेणेकरून रहिवाशांना दुर्गंधी येणार नाही आणि नागरिकांच्या आरोग्याची देखील काळजी घेतली जाईल,असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## ब्रेकिंग न्यूज

### डायलिसीस केंद्रांचे १ मे रोजी होणार लोकार्पण

मुंबई (दै. संध्या) : ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या "महाडायलिसीस" योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण करण्यात येणार आहे. राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाडायलिसीस' योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहोचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच निःशुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत.

## चमत्कार सिद्ध करा आणि ८० लाख मिळवा, नागपुरातून प्रतिआव्हान!

# धीरेंद्र शास्त्री विरुद्ध श्याम मानव वाद पेटला

मुंबई (दै. संध्या)



मध्यप्रदेशच्या बागेश्वर धामचे बाबा धीरेंद्र शास्त्री हे नागपूरमध्ये रामकथेच्या कार्यक्रमासाठी आलेले आहेत. त्यांच्या दौऱ्यात आधी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेले विधान वादग्रस्त ठरले. त्यानंतर आता त्यांनी केलेला चमत्काराचा दावा वादाच्या भोवऱ्यात आहे. शंभर दिवस व्हेंटिलेटरवर असलेल्या एका मुलाला स्वतःच्या पायावर उभे केल्याचा दावा करण्यात आला होता. या दाव्यावर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रमुख श्याम मानव यांनी यावर आक्षेप घेतला असून चमत्कार सिद्ध करण्याचे आव्हानच धीरेंद्र शास्त्री यांना दिले आहे. श्याम मानव म्हणाले की, धीरेंद्र शास्त्रींनी दुसऱ्यांदा आमच्या आव्हानातून पळ काढला आहे. त्यांच्या दिव्य दरबारा ऐवजी नागपूरच्या पत्रकारसंघासमोर चमत्काराचा प्रयोग करावा. ऐनवेळी धीरेंद्र शास्त्री यांच्यासमोर आम्ही १० माणसे उभी करू. या १० माणसांचे नाव, त्यांच्या वडिलांचे नाव, फोन नंबर धीरेंद्र शास्त्रींनी सांगायचा आहे. हे दावे त्यांनी दिव्य दरबारमध्ये आधीच केलेले आहेत. धीरेंद्र शास्त्री यांच्या दुसऱ्या दाव्याबद्दल माहिती देताना श्याम मानव म्हणाले, "धीरेंद्र शास्त्री यांनी सांगितल्याप्रमाणे ते कुणाच्याही घरात जाऊन काहीही पाहून येऊ शकतात. त्यापद्धतीने त्यांनी पत्रकार संघाच्या शेजारच्या खोलीत १० वस्तू ठेवल्या जातील, त्या त्यांनी ओळखून दाखवाव्यात. या दोन्ही प्रकारात जर धीरेंद्र शास्त्री यांनी ९० टक्के अचूक उत्तर दिल्यास त्यांनी दिव्यशक्तीचे आव्हान जिंकले आहे, असा त्याचा अर्थ होईल. मग आम्हीही मानू की त्यांच्या दिव्यशक्ती आहे. श्याम मानव पुढे म्हणाले की, पण धीरेंद्र शास्त्री हे आव्हान स्वीकारत नसतील. पत्रकारांसमोर येणार नसतील तर ते दिव्यशक्तीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करतात, लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन स्वतःचा लाभ करतात, असा जाहीर आरोप आम्ही त्यांच्यावर करतो.

२०२३ मध्येही आपण धीरेंद्र शास्त्री यांना आव्हान दिले असल्याची आठवण श्याम मानव यांनी करून दिली. ते म्हणाले, १९ फेब्रुवारी २०२३ रोजी पोस्टाने पत्र पाठवून त्यांना आव्हान दिले होते. तेच आव्हान आम्ही त्यांना पुन्हा देत आहोत. त्यावेळी आव्हानाची रक्कम ३० लाख रुपये होती. आता ती वाढवून आम्ही ८० लाख रुपये करत आहोत.

मात्र ही आव्हाने त्यांना पत्रकार संघात येऊन पूर्ण करावी लागणार आहेत. त्यांचा दिव्य दरबार किंवा प्रवचनाच्या ठिकाणी होऊ शकणार नाहीत. तिथे त्यांच्या नियंत्रणातील परिस्थिती असते. त्यामुळे त्यांच्यापर्यंत माहिती पोहोचण्याची शक्यता अधिक आहे. दिव्यशक्तीचा दावा असा सिद्ध करता येणार नाही. धीरेंद्र शास्त्री यांचे जितके वय आहे, त्यापेक्षा अधिक म्हणजेच ४४ वर्षांपासून अंधश्रद्ध निर्मूलन समिती काम करत आहे, असेही श्याम मानव यांनी सांगितले.

दरम्यान धीरेंद्र शास्त्री यांनीही श्याम मानव यांना प्रतिआव्हान दिले आहे. याबाबतचा त्यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओत ते म्हणाले, "यावेळी मी मध्यप्रदेशात नाही तर नागपूरमध्ये आहे. एकूण पाच दिवस मी इथे थांबणार आहे. हे राज्य, शहर आणि व्यासपीठही तुमचेच आहे. त्यामुळे कुणाला काही 'खुजली' असेल त्यांनी आमच्या दरबारात यावे. माझ्याकडे जी विद्या, जी शक्ती आहे, ती दाखवून देऊ. मी काही जादूगार नाही. मला ईश्वर जी प्रेरणा देतो, त्याप्रमाणे लोकांना मार्गदर्शन देतो. जर ते (श्याम मानव) आले तर त्यांनाही मार्गदर्शन देऊ." धीरेंद्र शास्त्री यांनी खुजली शब्द वापरून प्रतिआव्हान दिल्यानंतर श्याम मानव यांनीही कडाडून टीका केली. जो व्यक्ती स्वतःला बाबा असल्याचे सांगतो आणि खुजली सारखे शब्द वापरतो, यावरून त्यांची संस्कृती काय आहे, हे दिसून येते.

## गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आधुनिक सुविधा कामांना वेग

मुंबई (दै. संध्या)



■ वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

■ वाढीव खर्च मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी खर्चाच्या वाढीव मान्यतेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक घेण्यात येणार असून, या दृष्टीने उच्चाधिकार समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार विनोद अग्रवाल, वैद्यकिय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यावेळी म्हणाले, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार वैद्यकीय महाविद्यालय संकुलासाठी राज्य शासनाकडून वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत प्रशासकीय कार्यालयाच्या मुख्य इमारतीसह विविध विभागांचे काम प्रगतीपथावर आहे यातील सुविधा अत्याधुनिक असाव्यात यादृष्टीने कार्यवाही केली जात आहे. खासदार प्रफुल्ल पटेल आणि आमदार विनोद अग्रवाल यांनी महाविद्यालयाची सुसज्जता आणि आधुनिकतेच्या दृष्टीने विविध सूचना केल्या. या वैद्यकीय महाविद्यालयाची कामे लवकर पूर्ण केली जावीत, असेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी बैठकीत वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला. या संकुलाच्या उभारणीमध्ये मुख्य प्रशासकीय संकुल, ऑडिटोरियम, ॲनाटोमिक डिपार्टमेंट, शल्य चिकित्सा गृह, वॉर्ड , अतिदक्षता विभाग, एनआयसीयू यासह विविध कामे सुरू आहेत. सद्यस्थितीत यासाठी ७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून विविध सुविधा आणि शल्य चिकित्सा गृहाची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खर्चात वाढ होत आहे.

# संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात.

## संस्कृत सुभाषित

कृत न प्रतिकुर्यात् यः पुरुषाणां स दूषणः
कृते च प्रतिकर्तव्यं एषः धर्म सनातनः ॥

अर्थ : कृतीला प्रत्युत्तर न देणे हे पुरुषाला दूषणास्पद आहे आणि प्रत्युत्तर देणे हा सनातन धर्म आहे, असा पुरुषार्थ यात सांगितला आहे.

## गुरु वचन

### निराधारांची सेवा हेच आपले कर्तव्य

एक डॉक्टर गांधीजींच्या विचाराने खूपच प्रभावित होते. व गांधींच्या जवळचे होते. एकदा ते गांधीजीसोबत बडोदाहून अलाहाबादला पोहोचले. गांधीजी येणार असल्याची माहिती पूर्वीपासूनच होती. यामुळे स्थानकावर कार्यकर्त्यांच्या जमावाची चांगलीच गर्दी झाली होती. गांधीजीचे हात रिकामे होते पण डॉक्टर साहेबाच्या हातामध्ये एक बॅग होती. रेल्वेमधून खाली उतरताच एका कार्यकर्ता पुढे जाऊन डॉक्टरच्या हातातील बॅग घेऊ लागला. डॉक्टरने त्याला मनाई केली. त्यावेळी डॉक्टरचे लक्ष्य एका वयस्कर महिलेवर गेले. तिच्या कमरेला एक लहान मुलगा होता व दुसऱ्या हातामध्ये काही सामान होते. त्यामुळे तिला चालण्यास त्रास होत होता. डॉक्टर जमावाला धक्का देत त्या महिलेपर्यंत पोहोचले आणि म्हणाले, ताई आपल्याला खूप त्रास होत आहे. हे सामान माझ्याकडे द्या, मी तुम्हाला स्थानकाबाहेर नेऊन सोडतो. ती महिला लाजू लागली. त्यानंतर डॉक्टर म्हणाले, घाबरु नका मी काही चोर वगैरे नाही. तुमचे सामान कुठेही जाणार नाही. महिलेने आपले सामान डॉक्टराकडे दिले. तेव्हा दुसरे लोकही तिथे आले. एका कार्यकर्ता डॉक्टराच्या हातून सामान घेऊ लागला. तेव्हा ते म्हणाले, हे खूप हलके आहे. मला काही त्रास होत नाही. तुम्ही लोक त्याची मदत करा, ज्याला तुमच्या मदतीची गरज आहे. निराधारांची सेवा करणे आपले कर्तव्य आणि धर्म आहे.

## उपदेशकथा



### वडिलांना मदत

भगवान बुद्ध त्या काळात आपल्या शिष्यगणांसह गावोगावी जात होते. एका गावाच्या वेशीवर एक वृद्ध आपल्या मोठ्या टोपलीतून भाजी विकण्यास बसला होता.

ती टोपली जड होती व त्याला तेथून दुसरीकडे जायचे होते म्हणून येणाऱ्या – जाणाऱ्या वाटसरुंना तो आपल्या डोक्यावर टोपली ठेवण्यास मदत करण्याची याचना करत होता. पण कोणीही त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. ते शिष्यगणही मजा बघत होते. हे पाहताच भगवान बुद्ध स्वत: पुढे झाले व त्यांनी वृद्धाच्या डोक्यावर टोपली उचलून दिली. त्या वृद्धाने त्यांना ओळखले होते.

तो म्हणाला, साऱ्या जगाच्या दृष्टीने ते कोणीही असोत, पण माझ्या दृष्टीने माझ्या मुलासारखे आहेत ! त्याचे बोलणे ऐकून शिष्य आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले, हे कसे शक्य आहे? तो वृद्ध उत्तरला, जगात प्रत्येक मुलगा हा आपल्या मातापित्यांचा आधार असतो. त्यांचे कष्ट उपसण्यास नेहमीच मदत करत असतो.

आज त्यांनीही मला मदत केली आहे. माझे कष्ट हलके केले आहेत. मग ते माझ्या मुलासमानच नाहीत का? साऱ्या शिष्यांनी त्या वृद्धाचे पाय धरले व क्षमा मागितली.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वज्र २०:५४:२८ |
| ३० एप्रिल २०२६ | करण:गर ०८:२९:५१ |
| गुरुवार | करण:वणिज २१:१२:५१ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मेष |
| वैशाख शके | चन्द्र:तुला१३:१३:५६ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – जिल्काद |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – १२ |
| मास– वैशाख | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | श्री नृसिंह जयंती |
| शुक्ल पक्ष | राष्ट्रसंत तुकडोजी |
| तिथि:चतुर्दशी २१:१२:५१ | महाराज जयंती |
| नक्षत्र:चित्रा २६:१६:३१+ | पौर्निमा प्रारंभ रात्रौ ९.१२ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | 5 | | | | 9 | 3 |
| 6 | 5 | | | 7 | | 1 | 8 | |
| 3 | | | | | | | | |
| | 8 | 7 | 3 | 9 | | 4 | | |
| 4 | | 5 | | | | 6 | | 9 |
| | | 9 | | 5 | 1 | 3 | 7 | |
| | | | | | | | | 1 |
| | 7 | 3 | | 1 | | | 4 | 5 |
| 5 | 2 | | | | 9 | 8 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १३४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 1 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 6 |
| 8 | 5 | 4 | 6 | 2 | 7 | 9 | 1 | 3 |
| 9 | 6 | 2 | 1 | 5 | 3 | 4 | 7 | 8 |
| 4 | 8 | 7 | 2 | 6 | 9 | 1 | 3 | 5 |
| 5 | 2 | 9 | 3 | 7 | 1 | 8 | 6 | 4 |
| 3 | 1 | 6 | 5 | 8 | 4 | 7 | 9 | 2 |
| 2 | 7 | 8 | 9 | 3 | 5 | 6 | 4 | 1 |
| 6 | 4 | 5 | 7 | 1 | 2 | 3 | 8 | 9 |
| 1 | 9 | 3 | 8 | 4 | 6 | 2 | 5 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४५ – ॲडॉल्फ हिटलरची आत्महत्या.
- २००६ – चीनमध्ये कोळसा खाणीतील स्फोटात २४ कामगार ठार झाले.
- २००६ – नेपाळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गिरीज प्रसाद कोईराला यांनी नेपाळचे पंतप्रधान म्हणून पाचव्यांदा शपथ घेतली.
- २००७ – अमेरिकेच्या कंसास सिटीत एका बंदुकधाऱ्याने अंधाधुंध गोळीबार करुन चार जणांना ठार केले.
- २००७ – ब्रिटनच्या एका नेत्रहीन वैमानिकाने माइक्रोलाइट विमानाने अर्ध्या जगाची सफर करुन नवीन विक्रम प्रस्तापित केला.

### राष्ट्रीय

- १९३६ – सेवाग्राम आश्रमाची सुरुवात.
- २००७ – मानवी तस्करी प्रकरणातील आरोपी व निलंबित भाजपा खासदार बाबूभाई कटारा यांच्याकडे चौकशीनंतर ३५ पासपोर्ट जप्त करण्यात आले.
- २००८ – हलके व चालक विरहीत महत्त्वकांक्षी लक्ष्य या एअरक्राफ्टची चंदीपूर येथे घेतलेली उड्डाण चाचणी यशस्वी झाली.
- २००८ – सुप्रसिद्ध गायक महेंद्र कपूर यांना दादासाहेब फाळके अकादमीच्या गोल्डन वॉयस पुरस्काराने गौरविण्यात आले.

### जन्म

- १८७० – धुंडिराज गोविंद तथा दादासाहेब फाळकेयांचा जन्म.

### निधन

- १९१३ – व्याकरणकार मोरो केशव दामले यांचे निधन.
- २००३ – लेखक वसंत पोतदार यांचे निधन.

## : SMS :

Veeru: Basanti in kutton k aagay mat nachna, Sardar sitting with his dog in the theator said: "Nachegi kese nahi KUTTAY ka bhi ticket liya hai."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.४ | २७.६ |
| अहमदनगर | ३७.७ | २६.५ |
| अकोला | ४३.६ | २९.९ |
| अमरावती | ४१.९ | २८.६ |
| बीड | ४३.९ | ३३.३ |
| भंडारा | ४४.४ | ३१.८ |
| बुलढाणा | ३८.७ | २५.१ |
| चंद्रपूर | ४७.४ | ३३.२ |
| चेन्नई | ४५.७ | ३५.३ |
| नवी दिल्ली | ३८.९ | २८.९ |
| धुळे | ३९.६ | २८.१ |
| गोंदिया | ४३.६ | २९.९ |
| जळगाव | ४२ | २८.१ |
| कोल्हापूर | ३८.६ | २५.५ |
| लातूर | ३८.७ | २६.१ |
| मुंबई | ३७.८ | ३२.६ |
| नागपूर | ४१.९ | ३१.३ |
| नांदेड | ४१.५ | २९ |
| नंदूरबार | ३७.५ | २८.३ |
| नाशिक | ३७.५ | २४.५ |
| पुणे | ३५.८ | २४.३ |
| पंढरपूर | ४०.७ | ३०.६ |
| सातारा | ३८ | २४.८ |
| सांगली | ३९.४ | २६.४ |
| सोलापूर | ४१ | ३१ |
| वर्धा | ४३.४ | ३२.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग-पांढरा, शुभ दिशा- उत्तर आर्थिक सफलतेमुळे अहंकार वाढेल. लग्नाचे प्रस्ताव येतील.

**तुळ :** शुभ रंग-पिवळा, शुभ दिशा-पश्चिम धार्मिक, शुभा कार्यात सहभागी रहील्याने व्यस्त रहाल.

**वृषभ :** शुभ रंग-गुलाबी, शुभ दिशा-उत्तर अचानक लाभ होण्याचे योग आहेत. दूरदर्शीपणामुळे प्रत्येक कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग-गुलाबी, शुभ दिशा-दक्षिण बौद्धिक कार्यक्षमता वाढेल. करमणूक होईल. पत्नी सोबतचे संबध दृढ होतील.

**मिथुन :** शुभ रंग- लाल, शुभ दिशा-पश्चिम प्रतिष्ठीत लोकांच्या सहकार्याने आपले कामे सुरळीत पार पडतील.

**धनु :** शुभ रंग-क्रीम, शुभ दिशा-दक्षिण चैनीकडे मन झुकेल. रचनात्कम कार्यात प्रगती राहील. आपल्या बुद्धीचातुर्याचे कौतुक होईल.

**कर्क :** शुभ रंग-पांढरा, शुभ दिशा-उत्तर आपल्या योजना पूर्ण करू शकाल. व्यापार अनकूल राहील. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**मकर :** शुभ रंग-केसरी, शुभ दिशा-उत्तर आपल्या योजना यशस्वी होतील. जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. खर्चाला आळा घाला.


**सिंह :** शुभ रंग- पांढरा, शुभ दिशा-पश्चिम स्वत:च्या सामर्थ्यामुळे यश मिळेल. दुसऱ्यावर विश्वास ठेवू नका.

**कुंभ :** शुभ रंग-पांढरा, शुभ दिशा-पश्चिम आजूबाजूचे वातावरण प्रतिकूल राहील. मानसिक तणावामुळे कामात लक्ष लागणार नाही. आर्थिक तंगी राहील.

**कन्या :** शुभ रंग-पिवळा, शुभ दिशा- पश्चिम मनात शंका निर्माण होतील. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग -पांढरा,शुभ दिशा-पश्चिम नौकरीमधील वेळ प्रसन्नपूर्वक जाईल. वाचनाची रूची वाढेल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १३५



### आडवे शब्द

१. दुसऱ्यावर अवलंबून असलेला
६. खमंग
११. राजबिंडा
१२. तुरुंगाशिवाय कैदेत!
१५. अस्वस्थता, तडफड
१७. नाही या अर्थाचा काव्यातील शब्द
१९. खवा
२०. मद्य (हिंदी)
२२. चांगला
२४. जंगलातील रस्ता
२७. परीक्षा, निवड
२९. माफी मागणारा
३२. एक पौराणिक वाहन
३३. साठवणीचा एक पदार्थ
३५. पंख
३६. पद्म, कमळ
३८. उगीच
३९. अक्षराला दिलेली आकाराची रेघ
४०. विविध, अनेक
४१. संध्याकाळ
४२. गेलेला दिवस
४३. मनाचा थकवा
४५. मृत्यूदेवता
४७. मुलगा
४८. रहदारी
५०. पुष्कळवेळा
५२. टपाल
५४. पदार्थ शिजतानाचा आवाज
५७. रसाळ
६०. मार! ठोक!
६१. आत्या, मामी (ग्रा.)
६२. सीतेचे वडील
६४. शेतातील पीक
६५. स्वत:चे, स्वतंत्र
६६. सद्य:स्थिती, परिस्थिती
६८. खात्री करून घेणे
७१. थरथर
७२. सोन्याचा धागा
७३. अन्य, दुसरा
७५. मला
७६. यमनगरी
७८. ज्वाला, जाळ
७९. आवड, द्रव
८०. कहाणी
८३. दुसऱ्याच्या कष्टाची फळे खाऊ बघणारा (वा.प्र.
८४. अत्यंत उर्मट, उद्धट माणूस

### उभे शब्द

१. दुसऱ्याकडे भोजन
२. गवंडी, ३. कापड
४. पुंगी, ५. उंट हाकणारा
७. कारण, ८. गार
९. बूड, १०. चिंच कुस्करलेले पाणी
१३. लोकांचा घोळका
१४. श्रीरामाचे वडील
१६. मखर
१८. सृष्टीतील सर्व
२१. राजपत्नी
२३. तिबेटी धर्मगुरु
२५. वाकडा नसलेला
२६. कृपा, मेहरबानी
२८. टरबुजाचा भाऊ
३०. मागणी, विनंती
३१. मजबूत
३३. नट-बोल्ट घट्ट बसविण्याचे हत्यार
३४. भीती
३७. मधाच्या रंगाचे-गोडीचे
३८. गणपतीचे एक नाव
३९. वेळ घालविणे
४१. हाडांचा पिंजरा
४२. लबाडीचा हेतू
४३. दहावी रास
४४. हत्ती
४६. भिस्त, भरवसा
४७. पोसणारा, मालक
४९. नुकसान, तोटा, झीज
५१. भारत-चीन यामधील राष्ट्र
५३. सोनचाफा
५५. शेंगेवरील आवरण
५६. भारवाहक
५८. सर्वांना सारखे प्रमाण
५९. चांदी
६०. हस्ते परहस्ते
६३. सहजासहजी
६५. कंड
६७. प्रहार, घाव
६९. अंधार, ७०. धोबी
७३. पुन्हा
७४. जिव्हा
७७. दक्षिणा वाटण्याची जागा
७८. कमाई, मिळकत
८१. आश्रय
८२. जमिनीखाली वाढणारे एक तिखट चवीचे औषधी खोड

### जम्बो शब्दकोडे क्र. १३४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दुर्जन ४.सामदाम दंडभेद १०.जवळजवळ ११.गट १२.सारा १३.डबर १५.काका १६.लगाम १७.गरम १९.माळकरी २०.सारंग २१.नवरस २४.सरा २५.याग २६.नरम गरम २८.अनाथाश्रम २९.बकबक ३१.नाद ३२.जगन्नाथ ३३.कली ३४.ताई ३५.साल ३६.भकास ३८.कानशील ४०.बादल ४२.राम ४३.कळप ४४.अवसान ४६.शाल ४७.डबल ४९.लवाद ५१.तरस ५३.चोर ५४.चाकर ५६.यान ५९.उपकार ६०.लवाजमा ६३.वतनवाडी ६६.मालदार ६७.लस ६९.महाकाय ७१.साहस ७२.महासागर ७३.चरखा ७४.वरवर

उभे उत्तर : १.दुपेड २.नजर ३.खळबळजनक ४.सावकारी ५.मळका ६.मजलदरमजल ७.डगमग ८.भेट ९.आराम हराम १२.सार १४.बजरंगबली २०.साया २१.नगद २२.वर २३.अनाथ २४.सश्रम कारावास २७.मनाई २८.अन्नान्नदशा ३०.बस्तान ३३.कलकलाट ३४.ताल ३५.सालोसाल ३७.सम ३८.कापडचोपड ३९.शीतल ४१.ललत ४४.अनाकलनीय ४५.नवा ४८.बरका ५०.दया ५२.रतन ५५.रवा ५७.नवरदेव ५८.ताडी ६१.जमादार ६२.माल ६४.वार्ताहर ६५.तलम ६८.सहा ६९.मग ७०.हार ७१.साव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



# हिरकणी प्रेरणा कक्षाचे येरवडा खुल्या कारागृहात लोकार्पण

पुणे (दै. संध्या)

येरवडा खुल्या कारागृहातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज आणि प्रेरणादायी "हिरकणी प्रेरणा कक्ष" चे लोकार्पण आज उत्साहात पार पडले. "इनर व्हिल क्लब" पुणे (रिव्हर रिदम्स, प्लॅटिनम, रिव्हरसाईड आणि अपटाऊन) यांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके (भा.पो.से.), विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई तसेच कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. सुनील ढमाळ यांच्या हस्ते फीत कापून या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला येरवडा खुल्या कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी मान्यवरांचे स्वागत करून झाडाचे रोप भेट दिले. यावेळी इनर व्हिल क्लबच्या डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी अपर्णा प्रधान यांनी "हिरकणी प्रेरणा कक्ष म्हणजे मायेचे सुरक्षित कवच" असल्याचे सांगत, महिलांच्या आरोग्य, विश्रांती आणि मानसिक समाधानासाठी या कक्षाचे महत्त्व अधोरेखित केले.

महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यादरम्यान काही क्षण निवांत मिळावेत, तसेच त्यांच्या आरोग्याची आणि मुलांच्या संगोपनाची काळजी घेता यावी, या उद्देशाने हा कक्ष उभारण्यात आला आहे. हा केवळ एक कक्ष नसून महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि सकारात्मकतेसाठी एक महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी नमूद केले. इनर व्हिल क्लबच्या प्रतिनिधींनी या प्रकल्पामागील सामाजिक बांधिलकी स्पष्ट करत, 'हिरकणी'च्या जिद्दीचा वारसा जपत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, महिला कर्मचाऱ्यांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने असे उपक्रम काळाची गरज असून अत्यंत कौतुकास्पद आहेत.

**या कार्यक्रमाला इनर व्हिल क्लबच्या विविध शाखांचे पदाधिकारी, अध्यक्ष, सदस्य तसेच कारागृह प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदी उपस्थित होते. हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पाऊल ठरत आहे.**

# रुग्णालयाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करा : प्रकाश आबिटकर

पुणे (दै. संध्या)




येथील उपजिल्हा रुग्णालयाचे प्रलंबित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून येत्या महिन्याभरात रुग्णालय लोकार्पणासाठी सज्ज करावे, असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत हें निर्देश देण्यात आले.

या बैठकीत लोहगाव उपजिल्हा रुग्णालय तसेच येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पाठारे उपस्थित होते. लोहगाव परिसरातील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, भविष्यातील विमानतळ विकास आणि प्रस्तावित रिंग रोड यांचा विचार करता लोहगाव रुग्णालयाची ची क्षमता 200 खाटांपर्यंत वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत आरोग्य विभाग सकारात्मक असून या विस्ताराचा समावेश बृहत आराखड्यात करण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी दिल्या.

यावेळी आमदार बापूसाहेब पाठारे यांनी लोहगाव उपजिल्हा रुग्णालयाला संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे नाव देण्याची मागणी केली. या संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाआरोग्यमंत्र्यांनी दिल्या.

दरम्यान, लोहगाव उपजिल्हा रुग्णालय आणि येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय येथे आरोग्य उपसंचालक, पुणे व संबंधित अधिकाऱ्यांनी आमदारांच्या सोयीने प्रत्यक्ष पाहणी दौरा आयोजित करावा, असेही निर्देश देण्यात आले. लोकप्रतिनिधींच्या सूचनांनुसार कामांचा आढावा घेऊन संरक्षक भिंतीचे बांधकाम, अतिक्रमण हटविणे, वृक्षारोपण आणि इतर प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, नागरी आरोग्य अभियानाचे आयुक्त सुनील भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसचिव श्री. दिपक केंद्रे, उपसंचालक डॉ. भगवान पवार (पुणे) तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

लोहगाव आणि परिसरातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे रुग्णालय लवकरात लवकर सुरू करण्यावर शासनाचा भर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# 'सपने वर्सेस एवरीवन'च्या नव्या सीझनचा दमदार ट्रेलर रिलीज

पुणे (दै. संध्या)




भारताच्या सर्वाधिक लोकप्रिय मनोरंजन प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओने आज आपल्या आगामी प्राइम ओरिजिनल सीरिज 'सपने वर्सेस एवरीवन'च्या दुसऱ्या सीझनचा दमदार ट्रेलर रिलीज केला. हा ट्रेलर महत्त्वाकांक्षा, बदला आणि ओळखीच्या प्रभावी कथेला उजाळा देतो, जो मुंबईतील फिल्म इंडस्ट्री आणि रिअल इस्टेटच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. या सीरिजचे लेखन आणि दिग्दर्शन अंबरीश वर्मा यांनी केले आहे, तर अरुणाभ कुमार आणि विजय कोशी यांनी 'द वायरल फीवर'च्या बॅनरखाली याची निर्मिती केली आहे. पाच भागांची ही सीरिज पुन्हा एकदा अंबरीश वर्मा, परमवीर सिंह चीमा आणि विजयंत कोहली यांना प्रमुख भूमिकांमध्ये घेऊन येत आहे. यांच्यासोबत अभिषेक चौहान, निधी शाह आणि खुशाली कुमारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. ही सीरिज 1 मे रोजी प्राइम व्हिडिओवर हिंदी भाषेत भारतासह जगभरातील 240 पेक्षा अधिक देश आणि प्रदेशांमध्ये प्रीमियर होणार आहे. नवीन सीझनचा ट्रेलर प्रेक्षकांना पहिल्या सीझनमधील महत्त्वाच्या क्षणांची आठवण करून देतो आणि थेट पुढे येणाऱ्या घडामोडींमध्ये घेऊन जातो. मुंबईच्या फिल्म इंडस्ट्री आणि रिअल इस्टेटच्या उच्च दाव्यांच्या दुनियेत घडणारा हा ट्रेलर दाखवतो की प्रत्येक निर्णय मोठी किंमत मागतो, जिथे प्रभावशाली नातेसंबंध, मोठ्या रकमा आणि सत्तेची लढाई यांचा प्रभाव दिसतो. ही कथा प्रशांत (परमवीर सिंह चीमा) यांच्या संघर्षावर आधारित आहे, जो एका कठोर आणि निर्दयी फिल्म इंडस्ट्रीमध्ये आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. तर जिमी (अंबरीश वर्मा) रिअल इस्टेट आणि राजकारणाच्या धोकादायक दुनियेत विचारपूर्वक पुढे जात आहे, जिथे सर्व काही ताकद, महत्त्वाकांक्षा आणि नियंत्रणावर चालते. जसजसे जुने प्रसंग आणि जखमा समोर येतात, तसतशी त्यांची आयुष्ये संघर्ष, बदला आणि जोखमीच्या निर्णयांमध्ये अडकत जातात. ट्रेलरच्या शेवटी एक मोठा प्रश्न उभा राहतो. अशा जगात, जिथे स्वप्न सहज मिळत नाहीत आणि प्रत्येक यशासाठी मोठी किंमत मोजावी लागते, तुम्ही ती मिळवण्यासाठी किती दूर जाऊ शकता? प्रशांतला अखेर मोठी संधी मिळेल का? जिमी आपले जुने हिशेब चुकते करेल का? जिमीची भूमिका साकारणारे आणि 'सपने वर्सेस एवरीवन' सीझन 2 चे लेखक-दिग्दर्शक अंबरीश वर्मा म्हणाले, "सपने वर्सेस एवरीवन माझ्यासाठी फक्त एक प्रोजेक्ट नाही, तर एक स्वप्न आहे. पहिल्या सीझनला जगभरातील प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रचंड प्रेम आणि प्रतिसादामुळे आम्हाला दुसरा सीझन बनवण्याची प्रेरणा मिळाली.

# 'गव्हर्नर'चा फर्स्ट लूक पोस्टर केला रिलीज

पुणे (दै. संध्या)

विपुल अमृतलाल शाह यांनी अनेक वेगळ्या धाटणीचे चित्रपट दिले आहेत आणि आता ते आणखी एका रोचक प्रोजेक्टसह प्रेक्षकांसमोर येण्यास सज्ज आहेत. ताज्या अपडेटनुसार, त्यांच्या आगामी चित्रपटाचे पोस्टर्स समोर आले असून, त्यामध्ये चित्रपटाच्या नावासोबतच एक रहस्यमय सस्पेन्सही दिसून येतो. 'गव्हर्नर: द सायलेंट सेवियर' या चित्रपटाने मनोज बाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या पहिल्याच पोस्टरमुळे प्रेक्षकांमध्ये जबरदस्त उत्सुकता निर्माण केली आहे। काहीही जास्त न सांगता खूप काही सांगणारा 'गव्हर्नर: द सायलेंट सेवियर'चा हा पहिला पोस्टर रिव्हील करण्यात आला आहे, ज्याचे दिग्दर्शन चिन्मय मांडलेकर यांनी केले आहे. यात मनोज बाजपेयी पाठमोरे दिसतात,




हातात सूटकेस घेऊन कॉरिडॉरमध्ये चालताना. पोस्टरवरील टॅगलाईन आहे, "जर मी अपयशी ठरलो... तर इंडिया अपयशी ठरेल," जी एका हाय-व्होल्टेज लीगल ड्रामाची झलक देते। दुसऱ्या पोस्टरमध्ये हिरव्या रंगाची खुर्ची दाखवण्यात आली आहे, ज्यावर "इंडिया दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे" आणि "ही फक्त खुर्ची नाही... जबाबदारी आहे" अशा टॅगलाईन्स आहेत. हे देशाभोवती गुंफलेल्या गंभीर आणि प्रभावी कथेकडे निर्देश करते.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### "रफीनामा"ची जादू: सुरांनी भारावले प्रेक्षक, रफींच्या आठवणींना सुरेल अभिवादन

■ रफीनामा मैफिलीतून मोहम्मद रफी यांच्या आठवणींना उजाळा

पुणे (दैनिक संध्या) : मोहम्मद रफी यांच्या अमर स्वरांना वंदन करणारा "रफीनामा" हा सुरेल कार्यक्रम कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दिमाखात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात "सुहानी रात ढल चुकी" या भावस्पर्शी गीताने होताच सभागृहात शांतता आणि सुरांचे अद्भुत वातावरण निर्माण झाले. त्यानंतर "तेरी आंखों के सिवा", "क्या हुआ तेरा वादा", "चौदहवी का चांद" आणि "न जा कहीं अब ना जा" या गीतांनी रसिकांना अक्षरशः भूतकाळातील सुवर्णकाळात नेले. गायक राजेश दातार यांनी रफींच्या गायकीचा आत्मा जपत सादरीकरण केले, तर गायिका अनघा नवरे यांनीही आपल्या मधुर आवाजाने कार्यक्रमाला सुंदर साथ दिली. प्रत्येक गाण्याच्या आधी त्या गीतामागील कथा आणि भावार्थ उलगडत असल्याने कार्यक्रम अधिकच रंजक आणि माहितीपूर्ण ठरला. मध्यंतरानंतर "ओ मेरे शाहे खुबा", "तू इस तरह से मेरी जिंदगी में" आणि "मै जिंदगी का साथ निभाता चला गया" या गीतांनी वातावरण पुन्हा एकदा भारावून गेले. लाईव्ह ऑर्केस्ट्रासह सादर झालेल्या या कार्यक्रमाने प्रत्येक रसिकाच्या मनात सुरांची अविस्मरणीय आठवण निर्माण केली. वादक कलाकार सईद खान, आसिफ खान, चतुराज कोरे, अभिजीत जायदे आणि नितीन कुलकर्णी यांनी आपल्या सुरेल वादनाने कार्यक्रमाला भक्कम साथ दिली.

### प्रतीक्षा संपली! सोहम शाहची तुंबाड 2' 3 डिसेंबर 2027 रोजी होणार प्रदर्शित




पुणे (दैनिक संध्या) : 'तुंबाड 2'च्या निर्मात्यांनी अखेर चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली आहे. हा बहुप्रतिक्षित सिक्वेल 3 डिसेंबर 2027 रोजी प्रदर्शित होणार आहे, त्यामुळे चाहत्यांना आता चित्रपटाची वाट पाहण्यासाठी ठरलेली तारीख मिळाली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून टीम मोशन पोस्टर आणि चित्रपटाच्या पुनरागमनाशी संबंधित छोट्या अपडेट्सद्वारे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढवत होती. 2024 मध्ये 'तुंबाड'च्या पुन्हा रिलीजला मिळालेल्या मोठ्या यशानंतर ही घोषणा करण्यात आली असून, त्या यशामुळे हा चित्रपट पुन्हा चर्चेत आला होता.

### ग्राहकांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत प्राधान्याने सोडावाव्यात : सतीश राऊत



पुणे (दैनिक संध्या) : सर्व सामान्य ग्राहकांच्या समस्या मांडण्याचे काम जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्यावतीने करण्यात येते, ग्राहकांच्या समस्यांची गांर्भीयाने दखल घेवून त्या प्राधान्याने सोडाव्यात, ग्राहकांच्या हक्काचे उल्लंघन होणार नाही याद्दष्टीने सर्व संबंधित विभागाने कार्यवाही करावी, जिल्ह्यात अशा सूचना अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय तसेच अशासकीय सदस्य, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा परिषदेचे सदस्य सचिव महेश सुधाळकर, परिवहन, महावितरण, अन्न व औषध प्रशासन आदी उपस्थित होते.

# रखरखत्या उन्हात एकता सेवा प्रतिष्ठानच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन




पुणे (दै. संध्या)

एकता सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आज गुलटेकडी चौक पुणे येथे एकता सेवा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष गणेश शेरला यांच्या हस्ते सुयोग सेंटर येथे यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. भागातील कष्टकरी श्रमिक कामगार वर्ग तहानलेल्या नागरिकांना वाढत्या उन्हामुळे कोणत्याही प्रकारची पाण्याची अडचण भासू नये त्यांना थंड पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी हा उद्देश ठेवून गेल्या ८ वर्षा पासून हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे पदाधिकारी सचिन खंडागळे यांनी सांगितले. याबद्दल गणेश शेरला यांचे विशेष कौतुक केले उन्हाळ्याच्या द्दष्टीकोनातून असे उपक्रम शहराच्या प्रत्येक भागात राबविण्यात यावे असे आवाहन केले. यावेळी इर्शाद मोमिन, सलमान शेख,दिपक शिपकुले, यंशवत केबंळे, गणेश थिटे, मकबुल बागवान, बद्रीनाथ जन्नु, प्रभुदत्त जन्नु, महेश साळुंखे, नझीर शेख, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काश्मीरच्या सीमावर्ती भागात पुणेकरांचा मदतीचा हात

पुणे (दै. संध्या)

■ 'आम्ही पुणेकर' आणि काफिला फाऊंडेशन (जम्मू-काश्मीर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

■ उरी, लोलाब, केरन येथे शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी पाच दिवसीय उपक्रम




राष्ट्रीय एकात्मता, करुणा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत 'आम्ही पुणेकर' आणि काफिला फाऊंडेशन (जम्मू-काश्मीर) यांच्या संयुक्त विद्यमाने काश्मीरमधील सीमावर्ती भागांत पाच दिवसीय मानवतावादी मदत मोहीम राबविण्यात आली. उरी (बारामुल्ला), लोलाब व केरन (कुपवाडा) या दुर्गम भागांत हा उपक्रम पार पडला.

'हर घर शिक्षा, घर घर शिक्षा' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या मोहिमेचा मुख्य उद्देश शिक्षणाचा प्रसार आणि तरुणांमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यसनाविरुद्ध जनजागृती करणे हा होता. तसेच २२ एप्रिलच्या पहलगाम घटनेच्या स्मृतीनिमित्त शांतता, एकता आणि ध्येयवादाचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमात दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये शाळेच्या बॅगा, वह्या, पाण्याच्या बाटल्या, डबे आदींचा समावेश होता. ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय किट्सचे वितरण करून त्यांच्या मूलभूत आरोग्य गरजांकडेही लक्ष देण्यात आले. याशिवाय उरी सेक्टरमधील कठीण भूप्रदेशात पाणीपुरवठा सुधारण्यासाठी दोन जनरेटर संच, दोन वॉटर पंप आणि सुमारे १,२०० मीटर एचडीपीई पाइपलाइन उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमात जनक शाह, मान मेहुल शाह, आर्या मेहुल शाह, देव सिद्धार्थ शाह, रेवा महेश सोमाणी, दीपेश शाह, अपर्णा शाह, राहुल लड्ढा राखी लड्ढा आणि मयंक महेश सोमाणी विपुल कांबळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

'आम्ही पुणेकर' संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव म्हणाले, हा उपक्रम केवळ मदत वाटपापुरता मर्यादित नसून, लोकांमध्ये विश्वास निर्माण करणे, समुदायांना सक्षम करणे आणि शेवटच्या घटकापर्यंत सन्मानाने पोहोचणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी भारतीय सैन्याचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच कॉसमॉस जनक शाह आणि प्रोजेक्ट नर्चर यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम तळागाळातील लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.

# महिलांच्या व्यावसायिक संधींसाठी शासकीय योजनांचे बळ

पुणे (दै. संध्या)

संकलन – श्रीमती संप्रदा बीडकर, जिल्हा माहिती अधिकारी



महिलांचे आर्थिक सबलीकरणासाठी केंद्र व राज्य शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध योजनांनी बळ दिले आहे. या माध्यमातून सांगली जिल्ह्यातील हजारो महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळत असून, त्यांच्या स्वप्नांना नवे पंख मिळत आहेत. या माध्यमातून महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, प्रशिक्षण व आर्थिक मदत अशा माध्यमातून बळ दिले जात आहे.

जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, सामूहिक प्रोत्साहन योजना आणि उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम या योजना राबवल्या जातात.

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) ही सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाद्वारे (MSME) चालवली जाणारी एक प्रमुख क्रेडिट-लिंक्ड सबसिडी योजना आहे, ज्याद्वारे ग्रामीण व शहरी भागात नवीन स्वयंरोजगार प्रकल्प उभारण्यासाठी १५% ते ३५% पर्यंत सरकारी अनुदान (Subsidy) आणि कर्ज पुरवले जाते. ग्रामीण आणि शहरी भागात बिगर-कृषी क्षेत्रात नवीन सूक्ष्म उद्योग स्थापन करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हा या योजनेचा हेतू असून, यातून उत्पादनासाठी (Manufacturing) कमाल 50 लाख रुपये आणि सेवा (Service) क्षेत्रासाठी 20 लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातून ग्रामीण भागात २५%, शहरी भागात १५% अनुदान दिले जाते. तसेच, विशेष प्रवर्ग (SC/ST/OBC/महिला/माजी सैनिक/दिव्यांग) यांना ग्रामीण भागात ३५%, शहरी भागात २५% टक्के अनुदान दिले जाते. १८ वर्षांवरील महाराष्ट्राचा रहिवासी असलेला कोणताही व्यक्ती, ८ वी उत्तीर्ण (१० लाखांपेक्षा जास्त उत्पादन प्रकल्प किंवा ५ लाखांपेक्षा जास्त सेवा प्रकल्पासाठी) असे निकष आहेत. सदर सर्व योजनेचा २०२४-२५ मध्ये १२ व २०२५-२६ मध्ये १८ महिलांनी लाभ घेतला आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP) (Chief Minister Employment Generation Programme) ही महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी १ कोटीपर्यंत कर्ज आणि १५% ते ३५% पर्यंत सबसिडी (अनुदान) उपलब्ध करून देते. ही योजना उत्पादन क्षेत्रासाठी 1 कोटीपर्यंत आणि सेवा क्षेत्रासाठी 50 लाखांपर्यंत प्रकल्प खर्चासाठी लागू आहे. ग्रामीण आणि शहरी भागात बिगर-कृषी क्षेत्रात नवीन सूक्ष्म उद्योग स्थापन करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हा या योजनेचा हेतू असून, यातून उत्पादन क्षेत्रासाठी ₹ १ कोटी आणि सेवा/कृषी-आधारित उद्योगांसाठी ₹50 लाख कर्जमर्यादा आहे. प्रकल्प खर्चाच्या १५% ते ३५% पर्यंत सरकारी अनुदान मिळते. वय पात्रता १८ वर्षे पूर्ण असून शैक्षणिक पात्रता: ८ वी उत्तीर्ण आहे. फक्त नवीन उद्योजकांसाठीच ही योजना लागू आहे. सदर सर्व योजनेचा २०२४-२५ मध्ये ४४५ व २०२५-२०२६ मध्ये ६६८ महिलांनी लाभ घेतला आहे. तसेच, सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत महिला उद्योजकांकरिता शासनाने विशेष महिला धोरणांतर्गत एक टप्पा पुढील अनुदान व विशेष भांडवली अनुदान देय केले आहे.

आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, पॅन कार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्रे, प्रकल्प अहवाल (Project Report), जात प्रमाणपत्र (असल्यास), आणि ग्रामीण/शहरी भागातील रहिवासी पुरावा. पत्ता– जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन,सांगली, संपर्क क्रमांक-०२३३ २६७२५२६.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) (Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises) ही केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. याव्दारे नवीन व कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना 35 टक्के अनुदान (कमाल 10 लाख रूपये) आणि बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. शेतकरी, महिला, बचत गट (SHGs) आणि FPO या योजनेसाठी पात्र असून 'एक जिल्हा एक उत्पादन' (ODOP) ला प्राधान्य दिले जाते. प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या 35 टक्के किंवा कमाल 10 लाख रूपये (जे कमी असेल ते) अनुदान दिले जाते. 18 वर्षावरील व्यक्ती, स्वयंसहाय्यता गट (SHG), शेतकरी उत्पादक संघटना (FPO) सहकारी संस्था या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत. कर्ज – 35 टक्के अनुदान व 10 टक्के लाभार्थी हिस्सा सोडून उर्वरित रक्कम बँकेकडून कर्ज म्हणून मिळते. आंबा प्रक्रिया, मसाला उद्योग, तेलघाणा, बेकरी उत्पादने, भाजीपाला प्रक्रिया, लोणचे निर्मिती, डाळ मिल इत्यादी व्यवसाय याची उदाहरणे आहेत.

आवश्यक कागदपत्रे -आधार कार्ड, पॅन कार्ड, प्रकल्पाचा अहवाल (DPR), बँक पासबुक, जागेचा पुरावा, मशिनरी कोटेशन. या योजनेतून जिल्ह्यातील 1585 मंजूर प्रकल्पांपैकी जवळपास 50.47 टक्के म्हणजे 800 मंजूर प्रकल्पांच्या लाभार्थी महिला आहेत.

अर्ज प्रक्रिया – अर्ज ऑनलाईन PMFME पोर्टलवर करता येतो. अधिक माहितीसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. पत्ता – जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, तळमजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, विजयनगर, सांगली, संपर्क क्रमांक – 0233-2601412/2601413.

या विविध योजनांमळे महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, कर्ज व अनुदान मिळत असून सांगली जिल्ह्यातील महिलांच्या उद्योजकतेला आणि स्वावलंबनाला नवी दिशा मिळाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ल मेरिडियन सुरत सुरु करण्याची घोषणा

पुणे (दैनिक संध्या) : मॅरिएट बॉनवॉयच्या जागतिक पोर्टफोलिआचा भाग असलेल्या ल मेरिडियन हॉटेल्स ॲन्ड रिसॉर्टस् तर्फे ल मेरिडियन सुरत सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. हे सुरतमधील पहिले ल मेरिडियन हॉटेल असून गुजरातमधील दुसरे आहे.सुरत आंतरराष्ट्रीय विमानतळापासून केवळ तीन किमी अंतरावर असलेल्या या हॉटेलमध्ये सुरतच्या हिरे व वस्त्रोद्योग वारसापासून प्रेरित सुटससह कलात्मक नक्षीकाम असलेल्या 185 गेस्ट रूम्स आहेत.

### दाभोलकर खटल्यातील हिंदुत्वनिष्ठ युवक शरद कळसकर यांना जामीन !

पुणे (दैनिक संध्या) : दाभोलकरांच्या खूनानंतर तत्कालीन काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी तासाभरातच थेट हिंदुत्वनिष्ठ संघटनांकडे बोट दाखवले आणि तपास त्या दिशेनेच चालू झाला. 'प्लँचेट'चा वापर करून सनातन संस्थेचे नाव दाभोलकर (त्यांचा आत्मा!) घेत आहे, असे दाखवले जात होते, तर कधी तसे थेट आरोप दाभोलकरांचे कार्यकर्ते करत होते. हे सर्व चालू असतांना सनातन संस्था आणि तिच्या साधकांनी संपूर्ण तपासाला शांतपणे तोंड दिले. कधीही 'तपासयंत्रणांना सहकार्य केले नाही', असा आरोप संस्था किंवा संस्थेच्या साधकांवर झाला नाही. या पार्श्वभूमीवर वर्ष २०१५ ते २०२३ या काळात या प्रकरणाचा तपास उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चालू होता. मग अशा परिस्थितीत तपासात संस्थेच्या विरोधात काहीच मिळाले नाही. पाच जणांपैकी तीन जणांची निर्दोष मुक्तता सत्र न्यायालयाने यापूर्वीच केली आहे. शिक्षा झालेल्या दोघांपैकी एकाचा म्हणजे शरद कळसकर या हिंदुत्वनिष्ठ युवकाचा जामीन आज मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. उच्च न्यायालयाने 'आरोपी शरद कळसकर घटनास्थळी होता, हेच सिद्ध झालेले नाही', असे मानून हा जामीन दिलेला आहे, हे अतिशय महत्त्वाचे आहे.


**JAIHIND INTERNATIONAL SCHOOL & JR. COLLEGE**
Estd.1996
A/P-Kuran, Taluka - Junnar, District – Pune - 410 511.
Web-www.jaihind.edu.in E-mail: jcei.jaihind@gmail.com

**APPOINTMENTS**

Applications are invited for following posts to be filled on Temporary basis in for the academic year 2026-27.

Principal, Assistant Teacher, Librarian, Assistant Librarian, Sports Teacher,Craft Teacher, Clerk, Peon, Driver, Watchman, Sweeper

(1) Qualification, Experience: As per Government of Maharashtra.
(2) Application should be submitted by post or by hand on above address with complete bio-data & other necessary testimonials within 07 days from the date of publication of this advertisement.

Shri. Vijay M. Gunjal (Secretary, JCEI) Hon.Shri.Jitendra M. Gunjal (Chairman, JCEI)


# इंडिया AI हबसाठी गुगलची पायाभरणी




**विकसित भारतासाठी एअरटेल आणि अदानीकनेक्स द्वारे समर्थित**

**विशाखापटनम (दै. संध्या) :**

आज गुगलने विशाखापटनम (विजग), आंध्र प्रदेश येथे आपल्या महत्वपूर्ण AI हबचे उद्घाटन केले. जी आजपर्यंत कंपनीद्वारे भारतामध्ये केलेली सर्वात मोठी गुंतवणूक आहे. अदानीकनेक्स सह एअरटेल यांचे नेक्स्ट्रा या गिगावॅट-स्तरीय परिसंस्थेची उभारणी करण्यात अग्रगण्य राहणार आहेत, ज्यासाठी नेक्स्ट्राच्या सर्वोत्तम दर्जाचे डेटा सेंटर्स, संपूर्ण भारतात उपलब्ध असलेले अल्ट्रा-लो-लेटन्सीचे फायबर, हरित उर्जा, आणि अत्याधुनिक केबल लँडिंग स्टेशनचा वापर केला जाईल ज्यामुळे भारताच्या आर्थिक आणि पर्यावरणीय लवचिकतेसाठी गुगलची कटिबद्धता अधिक मजबूत होईल.

तर्लुवाडा समारंभामध्ये उपस्थित असलेले मान्यवर: श्री. अश्विनी वैष्णव, (रेल्वे, I&B, इलेक्ट्रॉनिक्स आणि ITचे केंद्रिय मंत्री); श्री. नारा चंद्राबाबु नायडू (AP मुख्यमंत्री); श्री नारा लोकेश (AP IT मंत्रीमहोदय); श्री. बिकाश कोले (गुगल क्लाउड VP); श्री. करण आणि जीत अदानी (अदानी समूहाचे संचालक); श्री. राकेश मित्तल (भारती एन्टरप्रायजेसचे व्हाइस चेअरमन).

समारंभाबद्दल बोलताना श्री. गोपाल विठ्ठल, भारती एअरटेलचे एक्झिक्युटीविह व्हाइस चेअरमन, म्हणाले, "हे महत्वपूर्ण AI केंद्र उभारण्यासाठी गुगल आणि अदानी यांच्यासह आमच्या धोरणात्मक भागीदारीद्वारे, आम्हाला भारताची डिजिटल महत्वाकांक्षा अधिक प्रगत करण्यात मदत होणार आहे. जागतिक AI नकाशावर एक नवीन केंद्र म्हणून उदयास येणाऱ्या विशाखापटनमसह, आम्ही सुनिश्चिती करू की भारत केवळ आपल्या लोकांसाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी नाविन्यपूर्ण आणि शाश्वत प्रगतीचा वेग निश्चित करेल. आमच्या सर्वोत्तम दर्जाच्या डेटा सेंटर्सचा संपूर्ण संच, हरित उर्जेचा वापर, पूर्ण भारतात उपलब्ध असलेले अल्ट्रा-लो-लेटन्सी फायबर, आणि अत्याधुनविक केबल लँडिंग स्टेशन विजग मध्ये मोठ्या प्रमाणावर जागतिक दर्जाची AI पायाभूत सुविधा उभारण्यास सक्षमता देईल."

श्री. अश्विनी वैष्णव, सन्माननीय IT मंत्रीमहोदय, भारत सरकार: "विशाखापटनम मधील इंडिया AI हबचा भूमीपूजनाचा हा समारंभ सन्माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांची भारताला तंत्रज्ञानामध्ये जगात अग्रणी बनवण्याची दूरदृष्टी प्रतिबिंबित करतो.

सन्माननीय एन. चंद्राबाबू नायडूजी, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेला पाठिंबा आणि कटिबद्धतेचे अत्यंत आभार की ही दूरदृष्टी त्यांनी ओळखली आहे. विशाखापटनम मध्ये स्थापित होणारे इंडिया AI हब आणि तीन उपसागरी केबल्स देशाच्या पुढील वाटचालीसाठी अत्यंत महत्वपूर्ण पायाभूत सुविधा ठरणार आहेत.

आंध्र प्रदेशचे सन्माननीय मुख्यमंत्री महोदय श्री. एन. चंद्राबाबू नायडू, म्हणाले: "वेग, विश्वास, आणि व्यवसायासाठी सुलभतेच्या पाठिंब्याने आंध्र प्रदेश हे भारताचे एक प्रमुख गुंतवणूक स्थान म्हणून उदयाला येत आहे. विशाखापटनम येथील गुगलचे AI हब हे आपल्या विस्तारणाऱ्या तंत्रज्ञान पट्ट्याचा एक महत्वाचा टप्पा बनेल, जो नाविन्यपूर्णतेला चालना देईल, आणि आपल्या युवा पिढीसाठी उच्च-मूल्याच्या संधी निर्माण करेल. ज्यामुळे जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत आपली स्थिती अधिक मजबूत होईल. आमचे ध्येय केवळ गुंतवणूक आकर्षित करण्याच्याही पलिकडचे आहे. आम्हाला स्थानिक प्रतिभावंत, स्टार्टअप्स, आणि उद्यमांना या तंत्रज्ञान-प्रेरित विकासाच्या वाटचालीमध्ये सक्रिय भागीदार बनवायचे आहे. केंद्र सरकारकडून भक्कम पाठिंब्यासह आणि विकसित भारताच्या ध्येयाच्या अनुरोधाने, गुगलसह ही भागीदारी अत्याधुनिक नाविन्यतेचे समावेशक प्रगतीसह संयोजन करण्याची आमची कटिबद्धता दर्शवते, ज्यामुळे संपूर्ण आंध्र प्रदेशातील प्रत्येक समाजामध्ये संधी पोहोचण्याची खात्री होणार आहे."

गुगल क्लाउडचे, CEO, श्री. थॉमस कुरियन म्हणाले: "आजचे भूमीपूजन म्हणजे भारत सरकारसह आमच्या सामाईक दूरदृष्टीची शक्तिमान पूर्तता आणि देशाच्या AI-स्थानीय भविष्यासाठी बदलाचा एक प्रारंभ बिंदू आहे. एकत्र मिळून आम्ही विकसित भारत साठी एक पाया उभारत आहोत आणि पूर्ण देशभरात आर्थिक संधींसाठी नवीन द्वारे खुली करत आहोत. गुगलचे AI हब हे सखोल सामुदायिक भागीदारींवर आधारित विकासासाठी एक शक्तिशाली माध्यम म्हणून काम करेल."

अदानी समूहाचे संचालक, जीत अदानी म्हणाले: "भारताचा AI काळ पायाभूत सुविधांद्वारे परिभाषित केला जाईल. आम्ही जे विशाखापटनम मध्ये उभारत आहोत, एकाच स्थानावर जवळपास 1 GW त्या बदलाचा संकेत देत आहे. जेव्हा उर्जा अधिक किफायती आणि स्वच्छ स्त्रोतांवर अधिकाधिक आधारित असेल, बुद्धिमत्ता अधिकाधिक सुलभ बनेल आणि याच प्रकारे भारत डिजिटल विकासाच्या पुढच्या टप्प्याचे नेतृत्व करेल."

## ममता सरकारने बंगालमधील नामांकित शैक्षणिक संस्था ही राजकीय अराजकतेची केंद्रे केली : धर्मेंद्र प्रधान

**मुंबई (दै. संध्या) :**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पश्चिम बंगालमधील शैक्षणिक संस्थांच्या सध्याच्या स्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या संस्थांना 'राजकीय अराजकतेची केंद्रे' केल्याचा आरोप त्यांनी केला. प्रधान म्हणाले की, बंगालमधील संस्थांना पुन्हा त्यांच्या पूर्वीच्या वैभव आणि शैक्षणिक उत्कृष्टतेकडे नेण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार हा राज्याचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न आहे. जादवपूर विद्यापीठातील अलीकडील घटनेचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) तज्ज्ञ समितीचा अहवाल हा राज्य सरकारच्या अपयशाचे ठोस उदाहरण आहे. एकेकाळी प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ घडवणारी ही संस्था आता 'निष्काळजी' प्रशासन आणि 'शून्य दायित्व' यामुळे ओळखली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. यूजीसीच्या समितीच्या निष्कर्षांचा उल्लेख करत प्रधान म्हणाले की, विद्यापीठातील रॅगिंगविरोधी यंत्रणा 'कमकुवत' असल्याचे नमूद करण्यात आले असून अनुदानात 10 टक्के कपात करण्याची शिफारसही करण्यात आली आहे.

## एन्काउंटर स्पेशालिस्ट नेमून निवडणुका जिंकणे हा कसला पराक्रम?

**मुंबई (दै. संध्या) :**

देशातील निवडणूक प्रक्रिया आणि यंत्रणांच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ठाकरे शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकप्रिय नेते असतील, तर त्यांना निवडणुका जिंकण्यासाठी अडीच लाख पॅरामिलिटरी फोर्स आणि एन्काउंटर स्पेशालिस्टची गरज का भासते? असा सवाल करत राऊत यांनी भाजपच्या निवडणूक जिंकण्याच्या पद्धतीला 'दडपशाही' असे संबोधले आहे. तसेच यावेळी त्यांनी बच्चू कडू यांच्या प्रहार पक्ष



शिवसेनेत विलीन करण्याच्या चर्चांवरही आश्चर्य व्यक्त केले. राऊत म्हणाले की, 'पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सारखे खंबीर नेतृत्वाला हरवण्यासाठी मोदी-शाहांनी संपूर्ण यंत्रणा राबवली. अडीच लाख निमलष्करी दल तिथे नेऊन ठेवले. जर उद्या अंतराळात राजकारण सुरू झाले, तर मोदी तिथलेही नेते होतील. पण त्यांना राज्या-राज्यात पोलीस फोर्स नेऊन, लोकांना धमक्या देऊन निवडणुका जिंकाव्या लागत आहेत. याचाच अर्थ त्यांना स्वतःचा पराभव स्पष्ट दिसत आहे. पराभवाचे रूपांतर विजयात करण्यासाठी हे सर्व उपव्याप सुरू आहेत. निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर बोलताना राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेत देशाच्या लोकशाहीत ही अत्यंत गंभीर गोष्ट घडत आहे. निवडणूक आयोग आता निष्पक्ष राहिलेला नसून, तो सत्ताधारी पक्षाला मदत व्हावी म्हणून दडपशाहीचा अवलंब करत आहे. प्रशासनाचा आणि आयोगाचा वापर करून निवडणुका जिंकणे हा लोकशाहीचा खून आहे, अशी टीका त्यांनी केली. बच्चू कडू यांच्या पक्षाच्या विलीनीकरणावर राऊत यांनी आश्चर्य व्यक्त केले. ज्या पद्धतीने देशभरात राजकारण सुरू आहे. ज्या पद्धतीने दडपशाहीचा वापर करून, लोकांवर दबाव आणून, आमिष दाखवून माणसांना बाजुला केले जात आहे. पक्ष फोडणे हा डरपोकपणा आहे. आता बच्चू कडूंवर कोणता दबाव आहे? हे मला माहीत नाही. बच्चू कडू एक अत्यंत प्रामाणिक नेता, शेतकरी, दिव्यांगांसाठी लढणारा नेता असे मी मानतो. आत्ता एका आमदरकीसाठी कुणी आपला पक्ष कोणात विलीन करत असेल, तर त्यावर नंतर बोलू,असे राऊत म्हणाले.

## अमराठी चालकांसाठी 'व्यवहारिक मराठी' शिकविण्याचा परिवहन विभागाचा पुढाकार

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्यातील प्रवासी सेवा अधिक सुसंवादी व प्रभावी करण्याच्या दृष्टीने परिवहन विभागाने अमराठी चालकांना 'व्यवहारिक मराठी' शिकविण्याचा महत्त्वपूर्ण पुढाकार हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत तयार करण्यात आलेल्या संक्षिप्त मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ही पुस्तिका विशेषतः रिक्षा, टॅक्सी तसेच Ola आणि Uber सारख्या



प्रवासी सेवा देणाऱ्या वाहनचालकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या सोप्या व आवश्यक मराठी वाक्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला असून, प्रवाशांशी सुसंवाद साधताना भाषेची अडचण येऊ नये आणि सेवा अधिक सुलभ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्रात सेवा देताना स्थानिक भाषेचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. 'व्यवहारिक मराठी'च्या माध्यमातून चालक आणि प्रवासी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होईल आणि सेवेत गुणात्मक सुधारणा घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिवहन विभागाच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, पुढील काळात राज्यभर अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनीही पुढाकार घेऊन मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.





**नावात दुरूस्ती**

old Name : Amjad Hajifakir, bhai Pansare
New Name : Amjad Faqirbhai Pansare
येथून पुढे इंग्रजीमधील नवीन नाव गृहित धरण्यात यावे.

**महाराष्ट्र शासन**
**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, बालेवाडी, पुणे-४११०४५.**
संकेतस्थळ: https://sports.maharashtra.gov.in ई-मेल: mahkridapeeth@gmail.com

**ई निविदा सूचना**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत शिवछत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे, बालेवाडी, पुणे येथील मुख्य प्रवेशद्वार (हायवेकडील बाजूचे) नव्याने बांधकाम करणे अनुभवी कंत्राटदार यांचेकडून खुल्या स्पर्धात्मक पध्दत्तीने ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा कागदपत्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावेत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी राखून ठेवला आहे. निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे आणि निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १३.०५.२०२६ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत आहे.

- स्वाक्षरीत-
**शीतल तेली उगले (भा.प्र.से.)**
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**क्रीयुसे/शिक्रीपी/२०२६-२७/का ११**
**क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C५०४**


## 'झेंडा मराठीचा... मराठी भाषेचा... मराठी कर्तृत्वाचा'

- 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन'चा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी १ मे रोजी आळंदी येथे,
- माजी मंत्री, आमदार सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतील मराठी भाषिकांसाठीचे जागतिक व्यासपीठ

**पिंपरी-चिंचवड (दै. संध्या) :**

मराठी भाषा, संस्कृती, परंपरा यांचा प्रचार-प्रसार आणि जागतिक स्तरावर मराठी समाजाचे एकत्रीकरण साधणे या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन' या नव्या जागतिक व्यासपीठाचा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी शुक्रवारी १ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता ऐतिहासिक आळंदी येथे होत आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या कृपासानिध्यात फाउंडेशनच्या संकल्पनेचे प्रणेते आणि लोकमंगल उद्योग समूहाचे संस्थापक आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वात फ्रुटवाले धर्मशाळा, आळंदी येथे हा सोहळा पार पडणार आहे. मराठी भाषा, संस्कृती आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने आमदार सुभाष बापू देशमुख (सोलापूर) यांनी हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला असून ते संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. वस्त्रोद्योग मंत्री म्हणून आ. सुभाष देशमुख यांनी केलेले कार्य वाखाणण्याजोगे होते आणि त्यातून उद्योगाला एक उभारी मिळाली. आ. देशमुख यांच्या कल्पक प्रयत्नातून हे नवे, जागतिक व्यासपीठ आकाराला आले असून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या ६६ व्या वर्धापनदिनी त्याचा शुभारंभ होत आहे. या शुभारंभ कार्यक्रमासाठी ज्येष्ठ निरूपणकार व प्रख्यात वक्ते मा. श्री. विवेकजी घळसासी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर, नामांकित उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ यांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे. 'झेंडा मराठीचा... मराठी भाषेचा... मराठी कर्तृत्वाचा' हे फाउंडेशनचे घोषवाक्य असून, मराठी भाषा व मराठी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे फाउंडेशनने ठाम वचन आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या जन्माला ७५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, ज्ञानेश्वरीतील अध्यात्मिक शिकवण आणि 'पसायदान'मधील विश्वकल्याणाचा संदेश जगभर पोहोचविणे हे फाउंडेशनचे प्रमुख ध्येय आहे. यासोबतच मराठी भाषा, संस्कृती व परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करणे, तसेच महाराष्ट्रातील मराठी शाळांचे पुनरुज्जीवन करून भाषा व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे, हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट संस्थेने डोळ्यांसमोर ठेवले आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात जगभर विखुरलेल्या मराठी समाजाला एका व्यासपीठावर आणून संवाद, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाची संधी उपलब्ध करून देणे, हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. शिक्षण, उद्योग, उद्योजकता आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत मराठी व्यक्तींना एकत्र आणून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणे, या दिशेनेही फाउंडेशन पावले टाकणार आहे. फाउंडेशनची रचना जागतिक स्तरावर समन्वय साधण्यासाठी करण्यात आली असून, जागतिक शिखर कार्यकारी समितीतीत १० सदस्य असतील, तर देशपातळीवरील कार्यकारी समित्या या प्रत्येकी ५ सदस्यांच्या असतील.

महाराष्ट्रातील ६ विभागांसाठी विभागीय समित्या या प्रत्येकी १० सदस्यांच्या असणार आहेत. या शुभारंभ सोहळ्याच्या निमित्ताने नामांकित उद्योजकांच्या उपस्थितीत उद्योजकीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. नवउद्योजकांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि समन्वय निर्माण करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे. या परिसंवादात डॉ. संजय वायाळ (उद्योग सल्लागार), मा. अप्पासाहेब कोंढारे (दुबई), मा. उदय भोसले (लंडन) आदी मान्यवर सहभागी होणार आहेत.


**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८**
स्थापत्य विभाग
ई निविदा सुचना क्र. स्थापत्य अ मुख्यालय/AHO/02/05/2026-27

1. निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतुन मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा.
2. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३. रॉयल्टी बाबत मनपा जे धोरण ठरवेल ते आपणांवर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (4+6) | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम रूपये | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी जी.एस.टी.सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | "प्रभाग क्र. १० मधील संभाजीनगर येथे स्टॉर्म वॉटर लाईनची कामे करणे." | 74,91,269 | 74,73,059 | 7,330 | 18,210 | 74,913 | 3,74,570 | 24 | 3,147 |
| २ | "प्रभाग क्र. १९ मधील नाला दुरुस्तीची कामे करणे." | 41,99,597 | 41,84,997 | 42,337 | 14,600 | 41,996 | 2,09,980 | 12 | 2,397 |
| ३ | "पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्वेक्षणानुसार प्रभाग क्र. १९ मधील रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे." | 14,99,738 | 14,66,118 | 2,114 | 33,620 | 14,997 | 74,990 | 12 | 2,397 |
| ४ | मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये स्ट्रक्चरल ऑडीट नुसार व इतर दुरूस्तीची कामे करणे. | 74,93,810 | 74,73,795 | 7,793 | 20,015 | 74,938 | 3,74,700 | 12 | 3,147 |
| ५ | "मुख्य प्रशासकीय इमारतीच्या महापालिका सभागृहाचे व आवश्यकतेनुसार नुतनीकरणाची कामे करणे." | 44,82,394 | 44,62,379 | 7,793 | 20,015 | 44,824 | 2,24,120 | 12 | 2,397 |
| | | 2,51,66,808 | 2,50,60,348 | 67,366 | 1,06,460 | 2,51,668 | 12,58,360 | | 13,485 |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक : 30/04/2026 ते दिनांक : 07/05/2026 |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दिनांक : 07/05/2026 दुपारी 03.00 वा.पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दिनांक : 11/05/2026 दुपारी 03.00 वा. (शक्य झालेस) |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

1. www.pcmcindia.gov.in 2. https://mahatenders.gov.in

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-epro@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005,0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहिरात क्र : 2026-27/30
जा. क्र. स्था/05/कावि/117/2026
दिनांक : 29-04-2026

सही/-
शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११०१८.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सोशल मीडिया रिल्सचा जीवघेणा स्टंट; धावत्या दुचाकीवर मुलांची अंघोळ

पिंपरी (दैनिक संध्या) : सोशल मीडियावर व्हायरल होण्याच्या नादात तरुणाई जीवाशी खेळत असल्याचे आणखी एक धक्कादायक उदाहरण काळेवाडी येथे समोर आले आहे. वर्दळीच्या तापकीर चौकात दोन अल्पवयीन मुलांनी धावत्या दुचाकीवर अंघोळ करत स्टंटबाजी केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या कृत्यामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काळेवाडीतील तापकीर चौकातून दुचाकीवरून जात असताना मागे बसलेल्या मुलाच्या हातात पाण्याची बादली होती. धावत्या दुचाकीवरच त्याने अंगावर पाणी ओतून घेत अंघोळ केली. हा संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये कैद करून सोशल मीडियावर रिल्स बनवण्यासाठी करण्यात आल्याचे समजते. भरधाव वाहतूक सुरू असताना आणि चौकात मोठी गर्दी असताना केलेल्या या धोकादायक स्टंटमुळे संबंधित मुलांनी स्वतःचा जीव धोक्यात घातलाच, शिवाय इतर वाहनचालकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण केला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडकर नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, "रिल्सच्या नादात अल्पवयीन मुले वाहतूक नियम धाब्यावर बसवत आहेत. अशा स्टंटबाजीमुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही." संबंधित मुलांवर तसेच त्यांच्या पालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणीही स्थानिकांकडून केली जात आहे. दरम्यान, या प्रकाराची दखल घेऊन वाहतूक पोलिसांकडून काय कारवाई केली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### प्रख्यात हार्मोनियम वादक संतोष घंटे यांना 'कलाकार आयकॉन पुरस्कार'



चिंचवड (दैनिक संध्या) : भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात हार्मोनियम वादनाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणारे संतोष घंटे यांना 'कलाकार आयकॉन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वेळी पद्मश्री प्रभुणे यांच्या हस्ते संतोष घंटे यांना सन्मानित करण्यात आले. हार्मोनियम सोलो वादनात त्यांनी केलेल्या जागतिक स्तरावरील प्रवासाची आणि भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.हा कार्यक्रम केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल पेरेंट्स फोरमच्या वतीने एल्प्रो प्रेक्षागृहात उत्साह 2026' या सांस्कृतिक सोहळा आयोजित करण्यात आला होता. भारतीय संगीताची परंपरा जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा आपला प्रयत्न पुढेही सुरू राहील. अशी ग्वाही घंटे यांनी दिली.

### मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात हॅट्रिक

पिंपरी (दैनिक संध्या) : सांगवी येथील जिल्हा रुग्णालयाच्या वतीने एप्रिल २०२५ ते मार्च२०२६ अखेरपर्यंत १,५९,०४८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. राज्य शासनाने या वर्षात दिलेले उदिष्ट पूर्ण करून पुणे जिल्ह्याने राज्यात सलग तीन वर्ष प्रथम क्रमांक पटकावत हॅट्रिक केली. वैद्यकीय उपसंचालक पुणे डॉ. भगवान पवार व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ अंजली कुलकर्णी यांनी हि मोहीम राबवली. राज्यातील एकत्रित मोतीबिंदू शस्त्रक्रिये मध्ये पुणे, वर्धा, रत्नागिरी, छ. संभाजीनगर, सांगली हे पहिले पाच जिल्हे आहेत. ज्यांनी १००% पेक्षा जास्त काम केले आहे. सर्वांत जास्त टार्गेट असूनही सर्वांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. तसेच डोळ्यांची बुबळे 1096 संकलित केले तर त्यातील 684 अंध व्यक्तींवर बुबूळांची प्रत्यारोपण शास्त्रकिया करून दृष्टी प्रदान केली.सलग तीन वर्षापासून राज्यात पुणे जिल्हा शस्त्रक्रिया करण्यात अव्वल येत आहे. सरकारी रुग्णालयात २७% वरून ते ८० टक्क्यापर्यंत मजल मारली आहे. पुणे जिल्ह्यात शस्त्रक्रिया करण्यासाठी अजून दोन तीन केंद्रे सुरु झाल्यास तर ही कामगिरीत १०० टक्क्याहून अधिक वाढ होईल.असा विश्वास जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ अंजली कुलकर्णी यांनी व्यक्त केला.जिल्हा रुग्णालय औंधसह, वैद्यकीय महाविद्यालये, पिंपरी-चिंचवड महापालिका, अशासकीय स्वयंसेवी संस्था व खाजगी नेत्ररुग्णालय यांचा सहभाग यात आहे. या सर्व रुग्णालयातील डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, नेत्र शल्यचिकित्सक अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने हे उदिष्ट गाठता आले.



### देहूरोड परिसर गोळीबाराच्या घटनेनं हादरला, भाजपचा कार्यकर्ता रमेश रेड्डी याचा मृत्यू

देहूरोड (दैनिक संध्या) : देहूरोडमध्ये एका भाजपच्या सक्रिय कार्यकर्त्यावर गोळीबार झाल्याची घटना रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तीला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, रुग्णालयात उपचार करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. भाजपच्या मृत्यू झालेल्या कार्यकर्त्याचं नाव रमेश रेड्डी असं आहे. भाजपचे सक्रिय कार्यकर्ते असलेल्या रमेश रेड्डी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला असून यात एकामागोमाग एक राऊंड फायर केलेत, यातील एक गोळी रमेश रेड्डी यांच्या मस्तकाला भेदून गेल्याने त्याना जखमी अवस्थेत देहूरोडच्या आधार हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केलं होतं. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. रमेश रेड्डीचे नातेवाईक मित्र परिवाराने हॉस्पिटलमध्ये आक्रोश करत जुना पुणे-मुंबई महामार्ग जाम करण्याचा प्रयत्न केला. पण देहूरोड पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर रमेश रेड्डीचा मृतदेह पिंपरी चिंचवडच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात हलवण्यात आला, तर रमेश रेड्डीवर हल्ला झाल्याचं कारण पोलीस तपासात समोर येणार आहे. या गोळीबाराच्या घटनेमुळे देहूरोड बाजारातील दुकाने व्यापारी वर्गाने त्वरित बंद केली. या घटनेनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. देहुरोडला गोळीबार झाल्याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी जखमी अवस्थेतील रमेश रेड्डी यांना रुग्णालयात नेलं, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. गोळीबारामुळं रमेश रेड्डी यांचा मृत्यू झाला. पिंपरी चिंचवडचे डीसीपी विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार देहुरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सवाना चौक येथे अग्निशस्त्र वापरुन एकावर हल्ला झाल्याची माहिती मिळाली होती. पोलीस घटनास्थळी पोहोचताच रमेश रेड्डी याच्यावर अज्ञात इसमांनी गोळीबार केल्याचं निष्पन्न झालं. सवाना चौकातील आधार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं, मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच रमेश रेड्डीचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी हल्लेखोरांच्या शोधासाठी पथकं पाठवली असल्याची माहिती देखील विशाल गायकवाड यांनी दिली आहे. दरम्यान, या प्रकरणातील हल्लेखोर कोण होते? कोणत्या हेतूनं रमेश रेड्डी यांच्यावर गोळीबार झाला, या सर्व गोष्टींचा तपास पिंपरी चिंचवड पोलिसांना करावा लागणार आहे.

## अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे तात्काळ उपवर्गीकरण करा

**युवराज दाखले यांच्या नेतृत्वात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन**




पिंपरी (दै. संध्या)

मातंग समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी *अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे तात्काळ उपवर्गीकरण* करण्यात यावे, या मागणीसाठी *हिंदू मातंग सेना व शिवशाही व्यापारी संघ तसेच पिंपरी चिंचवड शहर मातंग समाज* यांच्या वतीने आज तहसीलदार कार्यालयावर निदर्शने करण्यात आली.

शिवशाही व्यापारी संघाचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले व हिंदू मातंग सेनेचे संस्थापक प्रमुख अरूण जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड शहर मातंग समाजाचे नेते संदिपान झोंबाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत*बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसीलदार कार्यालय, निगडी-४४* येथे निदर्शने करून *मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस* यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देण्यात आले.

यावेळी युवराज दाखले म्हणाले, "दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या *मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यासह सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने* बहुमताने अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणासंदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला आहे.

राज्य सरकारने या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून अनुसूचित जातींमधील *शोषित व वंचित समूहाच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचा मार्ग मोकळा करावा.

"अ ब क ड वर्गीकरणाशिवाय खऱ्या गरजू व वंचित समाजाला न्याय मिळणार नाही. शासनाने याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करावा, अन्यथा हिंदू मातंग सेना व शिवशाही व्यापारी संघ* राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडेल," असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनात मातंग समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निदर्शने आंदोलनास पिंपरी चिंचवड शहर मातंग समाजाचे नेते संदिपान झोंबाडे, हिंदू मातंग सेना संस्थापक प्रमुख अरूण जोगदंड, सचिव संजय ससाणे, खजिनदार हनुमंत उर्फ नाना कसबे, मार्तंड देवस्थानचे विश्वस्त अनिल सौदडे, सामाजिक कार्यकर्ते मारूती जाधव, उद्योजक अनिल गायकवाड, चंद्रकांत दादा लोंढे, शिवशाही व्यापारी संघ प्रदेश अध्यक्ष कृष्णा साबळे, प्रदेश उपाध्यक्ष मंगेश डाखोरे, शिवशाही माथाडी कामगार आघाडी प्रदेश अध्यक्ष सचिन दोनघहू, अविनाश लोणारे, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे प्रबोधन पर्व अध्यक्ष बाबा रसाळ, मा अध्यक्ष भगवान शिंदे,

लहुजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष सतिश भवाळ, डॉ. हेमंत देवकुळे, सुनील भिसे, नितीन घोलप, आण्णासाहेब कसबे, मधुकर गवारे,चंद्रकांत दादा लोंढे, संजय एडके, शिवाजी साळवे,राजेंद्र मोरे, शिवाजी ढावरे,भारत गव्हाणे, रामदास राक्षे, पत्रकार संतोष रणसिंग, विलास रूपटक्के, सूरेश वैरागर, नर्सिंग वैरागर, विकास कांबळे,आकाश चव्हाण, शांताराम खुडे, पत्रकार अविनाश कांबीकर,निखिल अरणे, गणपत जाधव, शंकर खवळे, सुभाष लांडगे, बालाजी गवारे, संभाजी शिंदे, नाना कांबळे ,मारुती सोनटक्के, स्वप्नील वाघमारे, मयूर घोलप, संरपच संदीप जाधव, पैलवान विठ्ठल शिंदे, आबाजी भवाळ, हनुमंत वाघमारे,शिवशाही व्यापारी संघ उपनेत्या उषा माई कांबळे, सविता ताई आव्हाड,अनिता वैरागळताई, शिवशाही शहर अध्यक्षा दिपाली लोंढे, गीता आढागळे, राधा पाटोळे, कविता थोरात, आकाबाई गडसिंग,ललीता मगर,सविता दोनघऊ, आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या सनातनचे स्वामी आनंद स्वरुप यांना धडा शिकवणार : सतीश काळे

पिंपरी (दै. संध्या)



छत्रपती शिवाजी महाराजांबाबत सनातनचे धर्मगुरू स्वामी आनंद स्वरूप यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे पिंपरी-चिंचवडसह राज्यभर संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडने आक्रमक भूमिका घेत स्वामींच्या वक्तव्याचा कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे. संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी हे विधान इतिहासाचा अपमान असल्याचे सांगत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा स्वामी आनंद स्वरूप दिसतील तिथे जागा दाखवू असा इशारा काळे यांनी दिला.

सनातनचे धर्मगुरू स्वामी आनंद स्वरूप यांनी केलेल्या वक्तव्यात शिवाजी महाराजांच्या लढाईच्या पद्धतीबाबत वादग्रस्त टिप्पणी करण्यात आली होती. या विधानामुळे इतिहासाचा विपर्यास होत असल्याचा आरोप करत काळे यांनी संताप व्यक्त केला. "युद्ध पेशवे लढले आणि नाव शिवाजीचं झालं. शिवाजींनी कधी युद्ध मैदानात लढलं नाही तर फक्त छापामार युद्ध लढले. पेशव्यांनी मात्र युद्धाच्या मैदानात लढाई केली. धीरेंद्र शास्त्री जे बोलले त्याचं मी शब्दशः समर्थन करतो. त्यांनी माफी मागायची गरज नव्हती. असे स्वामी आनंद स्वरूप यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे.

काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून अशा वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला. त्यांनी संबंधित वक्तव्य करणाऱ्यांना "वाचाळवीर" संबोधत समाजात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही केला.

या प्रकरणामुळे शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक संघटनांकडूनही निषेध व्यक्त होत आहे. सोशल मीडियावरही या वक्तव्याचा तीव्र विरोध दिसून येत आहे. काही ठिकाणी आंदोलनाची तयारी सुरू असल्याची माहितीही समोर येत आहे.

संभाजी ब्रिगेडने स्पष्ट इशारा दिला आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांबाबत चुकीची विधाने सहन केली जाणार नाहीत.

इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्यांविरोधात कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने लढा दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. त्यातही त्यांनी योग्य वक्तव्य न केल्यास धीरेंद्र शास्त्री आणि स्वामी आनंद स्वरूप यांना संभाजी ब्रिगेड योग्य धडा शिकवेल असा इशारा ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतिश काळे यांनी दिला.

## पिंपरीत ६० कोटींचा अर्थसंकल्प घोटाळा; नगरसेवकांवर कारवाईची मागणी

पिंपरी (दै. संध्या)

बोगस उपसूचनांच्या आधारे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये वाढ आणि घट करून 60 कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना परस्पर अदा करण्यात आल्याच्या घोटाळा प्रकरणाचा प्राथमिक अहवालात पुढे आला आहे. त्या प्रकरणातील उपसूचनांवर नगरसेवकांनी सूचक व अनुमोदक म्हणून सह्या केल्या आहेत. त्यामुळे पदाचा गैरवापर केल्याने त्या नगरसेवकांना दोषी ठरवून त्यांच्यावरही फौजदारी कारवाई करण्यात यावी. त्यांचे नगरसेवक पद रद्द करावे, अशी मागणी विविध संघटना व राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे. बोगस 14 उपसूचनांच्या आधारे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये वाढ आणि घट करुन तब्बल 60 कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना परस्पर अदा करण्यात आली आहेत. त्या घोटाळा प्रकरणाचा प्राथमिक अहवालात चौकशी समितीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सादर केला आहे. त्यात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांच्यासह त्या विभागाच्या कर्मचार्यांना दोषी ठरविण्यात आले आहे. सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीची मान्यता न घेता काही बिले लेखा विभागाकडून परस्पर ठेकेदारांना अदा करण्यात आली आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 9 अंतर्गत कलम 84 (2), 86, 87 व 103 अन्वये अर्थसंकल्पातील निधीतून खर्च करणे, रक्कम कमी करणे किंवा बदली करणे आदीसाठी स्थायी समिती व महापालिका सभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र, या प्रकरणात 14 उपसूचनांच्या बाबतीत अशी नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## वल्लभनगर आगारात आरक्षणासाठी गर्दी; प्रवासी त्रस्त

पिंपळे गुरव (दै. संध्या)

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांची चाहूल लागताच गावी जाणाऱ्या प्रवाशांची लगबग वाढली आहे. पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारात आरक्षण काउंटरवर गर्दी वाढल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या मार्गांवरील बससेवांसाठी तिकीट बुकिंग करण्यासाठी प्रवाशांची अक्षरशः झुंबड उडत असून, आरक्षण खिडकीपुढे गर्दी होत आहे. परंतु बुकिंगसाठी येणाऱ्या नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सुटीत गावी जाणे हा नागरिकांचा मनस्ताप ठरत आहे. शाळा व महाविद्यालयांना सुट्या लागल्याने चाकरमानी विद्यार्थी आणि कुटुंबांसह प्रवासी मोठ्या संख्येने आपल्या मूळ गावी जाण्यासाठी आगारात दाखल होत आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून दररोज 300 ते 400 तिकिटांचे बुकिंग होत असून, आतापर्यंत अंदाजे दोन लाख रुपयांहून अधिकची उलाढाल झाल्याची माहिती मिळत आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असतानाही प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे वास्तव समोर आले आहे. वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर आगारात पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था आणि बसण्याची सोय नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह आलेल्या प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बाकडे किंवा कोणतीही आसन व्यवस्था उपलब्ध नाही ही बाब प्रवाशांच्या तीव नाराजीचे मुख्य कारण ठरत आहे.

## वाहतूक कोंडीने घेतला निवृत्त जवानाचा बळी; आळंदीत हृदयद्रावक घटना

आळंदी (दै. संध्या)



देवाच्या आळंदीची ओळख आता वाहतूक कोंडीची जीवघेणी आळंदी अशी बनण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कारण आळंदी शहरातील भीषण ट्रॅफिक जाममुळे उपचाराला उशीर झाल्याने सीआरपीएफचे निवृत्त जवान भिमाजी चौरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जगन्नाथ पार्क परिसरात राहणारे भिमाजी चौरे (वय अंदाजे 60) यांना रविवारी त्यांच्या राहत्या घरी अचानक तीव्र हृदयविकाराचा झटका आला. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. घरापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या के.के. हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करायचे होते. मात्र, पद्मावती रोड परिसरातील मंगल कार्यालयांमध्ये सुरू असलेल्या लग्न समारंभांमुळे रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.

वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने चौरे यांना घेऊन जाणारे चारचाकी वाहन पुढे सरकू शकले नाही. अखेर कुटुंबीयांनी गाडी रस्त्यातच सोडून रिक्षाने रुग्णालय गाठण्याचा निर्णय घेतला. रिक्षाला मार्ग मिळावा म्हणून त्यांच्या पत्नी आणि मुलगी रस्त्यावर धावत जाऊन वाहनचालकांना विनवण्या करत होत्या. दरम्यान, मुलगा वडिलांना वाचवण्यासाठी सीपीआर देत होता. परंतु, अवघ्या 2-3 मिनिटांच्या अंतरासाठी तब्बल 20 मिनिटे लागल्याने 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळू शकले नाहीत. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच भिमाजी चौरे यांची प्राणज्योत मालवली.

भिमाजी चौरे यांनी तब्बल 23 वर्षे देशसेवा केली होती. मात्र, निवृत्तीनंतर आपल्या शहरातील कुचकामी वाहतूक व्यवस्थेमुळे त्यांचा जीव गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेमुळे आळंदीतील वाहतूक नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, या गंभीर प्रकारानंतरही आळंदी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नसल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त 'जाणता राजा' या महानाट्याचे आयोजन

पिंपरी (दै. संध्या)




महाराष्ट्र दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी भव्य सांस्कृतिक मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कीर्ती सोहळा प्रतिष्ठान आयोजित आणि पद्मभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाचे ऐतिहासिक महानाट्य 'जाणता राजा' सादर करण्यात येणार आहे. निगडी, सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानात 'जाणता राजा' हे महानाट्य दि. १ मे २०२६ (शुक्रवार) रोजी सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हे महानाट्य सर्वांसाठी विनामूल्य असून सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक नाट्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे असणार आहेत. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, महेश लांडगे यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप,शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी याशिवाय शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया गटनेते कुणाल वाव्हळकर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, माजी उपमहापौर तथा नगर सदस्य राजू मिसाळ, शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी माहिती देताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, महाराष्ट्र दिनी या महानाट्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांचा जाज्वल्य इतिहास ठेवण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे शौर्य व कार्यापासून प्रेरणा घेवून या पिढीने कार्य करावे यासाठी या नाट्यप्रयोगाचे आयोजन केले आहे. पद्मभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित 'जाणता राजा' हे नाटक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असून त्यात त्यांच्या शौर्यगाथा, स्वराज्य स्थापनेचा इतिहास आणि मराठी अस्मितेचा अभिमान अत्यंत प्रभावी पद्धतीने मांडण्यात आला आहे. भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, जिवंत घोडे-हत्ती, आणि शेकडो कलाकारांचा सहभाग यामुळे हे नाटक प्रेक्षकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक उपक्रमातून शहरातील नागरिकांना इतिहासाशी जोडण्याचा आणि मराठी संस्कृतीचा अभिमान जागवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या या उपक्रमाचे शहरातील विविध स्तरांतून स्वागत होत असून, मोठ्या संख्येने नागरिकांनि उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणला श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रमास प्रारंभ

चाकण (दैनिक संध्या) : श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त विविध अशा धार्मिक कार्यक्रमांस प्रारंभ करण्यात आला असल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष किसनराव गोरे यांनी दिली. चाकण येथे समाज प्रबोधनकार हभप. पोपट महाराज राक्षे यांच्या कीर्तन रुपी सेवेने धार्मिक कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर झित्राईमळा येथील झित्राईमाता महिला भजनी मंडळाचा हरिजागराचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्या वाचस्पती हभप. डॉ. रविदासजी महाराज शिरसाठ यांचे कीर्तन व येथील सुभाष चौकातील शनेश्वर भजनी मंडळाचा हरी जागराचा कार्यक्रम संपन्न झाला. भागवताचार्य हभप. भगिरथ महाराज काळे यांच्या काल्याच्या किर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. त्यानंतर येथील श्री भैरवनाथ मंदिरात काल्याच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. किर्तनरुपी सेवेत व्यासपीठ चालक म्हणून समाज प्रबोधनकार हभप. कल्याण महाराज कल्याणकर हे काम पाहत आहेत. मृदंगाचार्य, गायनाचार्य व विणेकरी म्हणून संत रघुनाथ बाबा आश्रमातील विद्यार्थ्यांनी कीर्तनासाठी साथ दिली.

### सावित्री फाउंडेशनच्या माध्यमातून लोकोपयोगी उपक्रम राबविणार - ॲड. मालिनी शिंदे



चाकण (दैनिक संध्या) : क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांचे विचार व आचार यांच्या धर्तीवर आधारित चाकण येथे स्थापन करण्यात आलेल्या सावित्री फाउंडेशनच्या माध्यमातून समाजात लोकोपयोगी उपक्रम राबविणार असल्याची माहिती फाउंडेशनच्या संस्थापक - अध्यक्षा ॲड. मालिनी शिंदे यांनी दिली. महिला सक्षमीकरण व इतर महत्त्वाच्या सामाजिक विषयांसाठी सावित्री फाउंडेशन कार्य करणार आहे. समाजाला महापुरुषांच्या मिरवणुकां बरोबरच त्यांचे आचार, विचार व आदर्श रुजविण्यासाठी सामाजिक संस्थांची गरज असल्याचे ॲड. मालिनी शिंदे व ॲड. प्रीतम शिंदे यांनी सांगितले. जोपर्यंत विश्वाला गती आहे, तोपर्यंत सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची फुलबाग टवटवीत राहणार आहे. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून चाकण येथील ॲड. शिंदे दाम्पत्यांनी सावित्री फाउंडेशन स्थापन केले आहे. राजकीय चिखलात सामाजिक भावना आणि फुले यांचे कार्य मागे पडत चालले असून, हे कार्य पुढे सुरू राहणे गरजेचे आहे. या संस्थेला ८० जी चे अधिकृत प्रमाणपत्र मिळाले असल्याने देणगीदारांनाही करात सवलत मिळणार असल्याचे ॲड. मालिनी शिंदे व ॲड. प्रीतम शिंदे यांनी सांगितले.

### चाकण येथे बलदंड बिबट्या जेरबंद

चाकण (दैनिक संध्या) : चाकण परिसरात बिबट्यांचा मानव वस्तीत मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे. चाकण लगतच्या राक्षेवाडी येथे मंगळवारी (दि.२८) रात्री उशिरा एका बलदंड बिबट्यास वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले. जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्याला जुन्नर तालुक्यातील माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात दाखल करण्यात आले. दोनच दिवसांपूर्वी आगरकरवाडी परिसरात एक बिबट्या पिंजऱ्यात अडकला होता. राक्षेवाडी व आगरकरवाडी परिसरात वनविभागाने आणखी पिंजरे लावण्याची मागणी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी केली आहे.



### शिवसेना भविष्यकाळातील सर्व निवडणुका स्वबळावर लढणार : भगवान पोखरकर

चाकण (दैनिक संध्या) : शिवसेनेच्या संघटना बांधणीला खेड तालुक्यात प्रचंड वेग आला असून, आगामी काळात होणाऱ्या सर्व निवडणुका शिवसेना स्वबळावर लढणार असल्याचा निर्धार शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर यांनी येथे केला. खेड - आळंदी विधानसभा मतदार संघात मतदान नोंदणी अभियानांतर्गत तालुक्यातील प्रत्येक गावात बीएलए मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे राबवले जात आहे. या अभियानात येथील उद्योजक सचिन नथुराम लांडगे यांनी यशस्वीपणे काम केले. याबद्दल लांडगे यांचा चाकण येथे भगवान पोखरकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यावेळी पोखरकर बोलत होते. याप्रसंगी संपर्कप्रमुख तथा जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, सह संपर्कप्रमुख विकास रेपाळे, जिल्हा उपप्रमुख प्रकाश वाडेकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, उद्योजक किरण कौटकर आदी उपस्थित होते. पोखरकर यांनी पुढे सांगितले की," प्रत्येक गावामध्ये मतदार नोंदणी अभियान राबवले जात आहे. या अभियानात सर्वांचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे असून भविष्यकाळात अशा नोंदणीचा निश्चितच सर्वांना फायदा होईल. या अभियानापासून कोणी वंचित राहू नये, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. खेड तालुक्यातील राजगुरुनगर, चाकण व आळंदी परिसरात या मतदार नोंदणी अभियानाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे." प्रकाश वाडेकर यांनी आभार मानले.

### राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी शाळेचा एनएमएमएसमध्ये 100% निकाल

आळंदी (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत संचालित राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी महाराज इंग्रजी माध्यम विद्यालय, वडगाव शेरी (मनपा शाळा क्र. ९९जी) येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून १९ पैकी सर्व १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी चार विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या परीक्षेत प्रिन्सकुमार उमेश साहा (१३३ गुण) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मोहम्मद अर्शान रईस शेख (१२९ गुण) द्वितीय, साईनाथ पांडुरंग मधासवाड (१२३ गुण) तृतीय, तर महेश्वरी जयकुमार पांडगळे (१११ गुण) यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांसाठी प्रतिमहिना एक हजार रुपये प्रमाणे एकूण ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे.

# पुणे जिल्हा परिषदेच्या २० उपक्रमशील शिक्षकांना लॅपटॉप देऊन विशेष गौरव

**मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते सन्मान; CSTE (कोडिंग) कोर्स यशस्वी पूर्ण केल्याबद्दल कौतुक**

जेजुरी (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषद (प्राथमिक शिक्षण विभाग), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) पुणे आणि 'लीडरशिप फॉर इक्विटी' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या CSTE (कोडिंग) कोर्समध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या टॉप २० शिक्षकांचा पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील साहेब यांच्या हस्ते लॅपटॉप देऊन गौरव करण्यात आला.

गेल्या तीन वर्षांपासून जिल्ह्यात हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जात आहे. यावर्षी या कोर्ससाठी जिल्ह्यातील एकूण १०७६ शिक्षकांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७६ शिक्षकांनी हा खडतर कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या सर्व यशस्वी शिक्षकांचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमात राजगड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे उपक्रमशील शिक्षक सोमनाथ शिंदे यांनी टॉप १० शिक्षकांमध्ये स्थान पटकावून या कोर्समध्ये विशेष यश संपादन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते त्यांना सन्मानपूर्वक लॅपटॉप प्रदान करण्यात आला.




या प्रसंगी बोलताना गजानन पाटील म्हणाले की, "तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी कोडिंगसारखे विषय आत्मसात करणे कौतुकास्पद आहे." पुरस्कार प्राप्त २० शिक्षकांच्या शाळांमध्ये अद्ययावत संगणक लॅब उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

कोर्स पूर्ण केलेल्या उर्वरित शिक्षकांना ऑनलाइन प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षण अधिक तंत्रस्नेही होण्यास मदत होणार आहे.

या गौरव सोहळ्याला पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह अतिरिक्त कार्यकारी अधिकारीवाघमारे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, उपशिक्षणाधिकारी आस्मा शेख डाएट पुणेचे अधिव्याख्याता, लीडरशिप फॉर इक्विटी संस्थेचे पुणे विभागाचे मयूर काटरे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## माती वाहतूक करणारा हायवा कोसळला थेट घरावर

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यात बेकायदेशीर माती वाहतूक सुरु असून माती वाहतूक करणारा हायवा थेट घरावर कोसळला चालकाचे स्टेरींग वरील ताबा सुटल्याने माती वाहून नेणारा हायवा क्रमांक एम एच 14 JG1552 थेट एका घराच्या भिंतीला घुसून पलटी झाला!बाजूलाच एक लहान मुलगा खेळत होता. मात्र आवाजाने तो घाबरला आणि तेथून रडतरडतच पळाला. चालक दारू पिऊन तर्र होता. अपघाता नंतर त्याने बाहेर येऊन बाजूला बसला त्याला व्यवस्थित बोलताही येत नव्हते!ही घटना माणकेश्वर ता. जुन्नर येथे घडली. माती वाहतूक करणारी वाहने माती, मुरूम वाहने बेकायदेशीर वाहतूक करीत असून याकडे महसूल विभागाचे सपशेल दुर्लक्ष दिसून येत आहे. RTO विभागाचेही मुरूम आणि माती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर लक्ष नसल्याची बाब समोर आली आहे. हायवा घरात पलटी झाला तेव्हा चालक मद्यधुंद अवस्थेत होता. गाडी पलटी झाल्यानंतर तो बाजूलाच बसून आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वी मद्यधुंद अवस्थेतील महसूल अधिकारी उभ्या हायवा गाडीवर जाऊन धडकले? ही बाब

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प १ मे पासून वाहतुकीसाठी खुला

भिवंडी (दै. संध्या)

**अवजड वाहनांना तूर्तास प्रवेशबंदी**

मुंबई आणि पुणे या दोन शहरांमधील प्रवासाचे अंतर आणि वेळ कमी करणाऱ्या बहुप्रतिक्षित यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे काम आता पूर्ण झाले असून, हा मार्ग १ मे २०२६ पासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) आणि पोलीस प्रशासनाने या मार्गावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्यासंदर्भात अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे यांनी अधिकृत अधिसूचना जारी केली आहे.

पहिल्या टप्प्यात १ मे २०२६ ते ३१ मे २०२६ या कालावधीत केवळ हलकी मोटार वाहने (LMV) आणि बस तसेच प्रवासी वाहनांनाच या नवीन मार्गावरून प्रवासाची परवानगी असेल. या काळात मालवाहू वाहनांना या मार्गावर पूर्णपणे प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यानंतरच्या दुसऱ्या टप्प्यात, म्हणजेच १ जून २०२६ पासून, हलकी वाहने आणि बससाठी हा मार्ग खुला राहीलच, मात्र मालवाहू वाहनांना प्रवेश द्यायचा की नाही, याचा निर्णय सुरुवातीच्या सहा महिन्यांच्या निरीक्षणांनंतर घेतला जाईल.

सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने काही कडक निर्बंधही लागू केले आहेत. विशेषतः ज्वलनशील, स्फोटक किंवा धोकादायक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या 'हॅझमॅट' (HAZ-MAT) वाहनांना या 'मिसिंग लिंक' प्रकल्पातील बोगद्यांमधून प्रवास करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली असून, अशा वाहनांनी जुन्या अस्तित्वात असलेल्या द्रुतगती मार्गाचाच वापर करणे अनिवार्य असेल.

वेगमर्यादेबाबत स्पष्ट करताना प्रशासनाने नमूद केले आहे की, या मार्गावरील बोगद्यांमध्ये हलक्या वाहनांसाठी ताशी १०० किलोमीटर आणि बस व इतर प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किलोमीटर इतकी कमाल वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटर वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल, मात्र निर्धारित वेगमर्यादेपेक्षा ५ टक्क्यांपर्यंत जास्त वेग आढळल्यास कायदेशीर सवलत मिळू शकेल. हा नवीन मार्ग सुरू झाल्यामुळे घाटातील वाहतूक कोंडीतून प्रवाशांची मोठी सुटका होणार असून प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या वाचणार आहे.

हा आदेश १ मे २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहणार असून प्रवाशांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## फसलेल्या नियोजनामुळे कुंजीरवाडीत वाहतूक कोंडी

लोणी काळभोर (दै. संध्या)

पुणे–सोलापूर महामार्गावरील नायगाव फाटा चौक येथील दुभाजक बंद केला खरा पण फसलेल्या नियोजनामुळे कुंजीरवाडी चौकात प्रचंड वाहतूक कोंडी होत असुन साधारण ४ ते५ किलोमीटर पर्यंत वाहतूक कोंडी दिसुन येत आहे .त्यामुळे प्रशासनाने पर्यायी व्यवस्था न करताच कुणाला खुष ठेवण्यासाठी व नागरिकांचे हाल करण्यासाठी हा दुभाजक बंद केला आहे .अशी चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे .




पुणे - सोलापूर महामार्गावरील नायगाव फाटा येथील दुभाजक बंद करण्याचा प्रशासनाच्या निर्णयामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. वाहतूक कोंडीला व अपघातांना आळा बसण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या निर्णयामुळे बंद केलेल्या दुभाजकाच्या पुढील कुंजीरवाडी चौकात महामार्गावर दररोज ४ ते ५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. पर्यायी दुभाजक व सेवा रस्त्यांचे योग्य नियोजन न केल्याने कामगार, विद्यार्थी आणि रुग्णवाहिकांना तसेच लग्नाला जाणाऱ्या नागरिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकावे लागत आहे . चार चार लेन वाहन चालक करुन सुध्दा येथे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे .प्रशासनाच्या या 'नियोजनशून्य' कारभारावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे .दुभाजक बंद करताना वाहतूक कोंडी व अपघात होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे होती . तशी न घेतल्याने येथे दररोज वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे .

नायगाव चौकात उरुळी कांचन पॅंर्टन राबविण्याची घाई केली पण उरुळी कांचन सारखे पर्यायी दुभाजक न काढल्याने येथे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर येथे पर्यायी दुभाजक योग्य जागी काढावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## नारायणगाव बसस्थानक बनलाय चोरांचा अड्डा

नारायणगाव (दै. संध्या)


नारायणगाव बसस्थानक येथे मंगळवार दिनांक २८/०४/२०२६ रोजी दुपारी सव्वाबारा ते दोन वाजण्याच्या सुमारास बोरी खुर्द साळवाडी येथील मीरा गणपत शिंदे (वय 48 वर्ष) या मुंबई येथे जाण्यासाठी निघाले असताना बसमध्ये बसत असताना गर्दीचा फायदा घेवुन अज्ञात चोरट्याने 6 लाख 30 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे प्रत्येकी 4.5 तोळे वजनाचे 2 मंगळसूत्र,1 लाख 40 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे 2 तोळे वजनाचे एक मंगळसुत्र,1 लाख 40 हजार रुपये किंमतीची सोन्याची 2 तोळे वजनाची एक चैन बोरमाळ,व 1 लाख 40 हजार रुपये किंमतीची सोन्याच्या 2तोळे वजनाच्या दोन बांगड्या, 2 लाख 24 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे ३.२ तोळे वजनाचा एक राणीहार तसेच 3 लाख 50 हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या प्रत्येकी अर्धा तोळा वजनाच्या दोन अंगठ्या, 70 हजार रुपये किंमतीच्या सोन्याचे एक तोळे वजनाचे झुमके एक जोडी असा एकूण 16 लाख 94 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली. सध्या यात्रा, उत्सव, लग्न समारंभ असल्याने बस स्थानक परिसरात प्रवाशांची गर्दी आहे. या संधीचा फायदा चोरटे घेत आहेत.

## पुलांच्या दुरुस्तीसाठी भरघोस निधी मंजूर : आ. बाबाजी काळे

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी विविध पाच पुलांच्या दुरुस्ती तसेच दोन साकव बांधकामांसाठी भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ही कामे लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी दिली. सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खेड यांच्याकडे संबंधित पुलांच्या दुरुस्तीबाबत सातत्याने पाठपुरावा करून निधीची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार पुढील कामांना मंजुरी देण्यात आली आहे. वांद्रे, आंबोली, पाईट, शिरोली या मार्गावरील पापळवाडी येथील पुलाच्या दुरुस्तीसाठी ४० लाख, १५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निघोजे, चिंबळी, आळंदी, धानोरे मार्गावरील निघोजे येथील पुलाच्या दुरुस्तीसाठी ४१ लाख, १३ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. धामणे, आसखेड, कुरकुंडी, कोरेगाव, चांदूस, पिंपरी, वाकी, काळूस,भोसे या मार्गावरील काळूस गावाजवळील पुलाच्या दुरुस्तीसाठी तब्बल ९९ लाख ९७ हजार रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. याशिवाय वांद्रे, आंबोली, पाईट, शिरोली या मार्गावरील कोये गावाजवळील पुलासाठी २९ लाख, ६२ हजार रुपये मंजूर झाले आहेत. चांदूस गावाजवळील लहान पुलाच्या बांधकामासाठी ९१ लाख, ३९ हजार रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये एकूण ३ कोटी रुपयांचा निधी यासाठी उपलब्ध झाला आहे. या कामांमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुकर होण्यास मदत होणार आहे. याचबरोबर गोसासी येथील समाज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधण्यासाठी १ कोटी रुपये तसेच वाफगाव येथील माघाडे वस्ती, बौद्धवस्ती आणि नेटकेवस्तीला जोडणाऱ्या रस्त्यावर साकव उभारण्याच्या कामासाठी ६० लाख रुपये या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासासाठी या कामांचा मोठा फायदा होणार आहे. आ. बाबाजी काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे खेड तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते व पूल दुरुस्तीच्या कामांना गती मिळत असून, भविष्यातही विकास कामांसाठी कटिबद्ध राहणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## पोल्ट्री शेडमुळे कुटुंबायांना गंभीर त्रास



लोणी काळभोर (दै. संध्या)

पोल्ट्री फार्ममुळे स्थानिक कुटुंबीयांना गंभीर त्रास सहन करावा लागत असून, याबाबत ग्रामपंचायत व वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे गणेश बापू चोरघे (रा. गट नं. ३२७, चोरघे वस्ती, आळंदी म्हातोबाची) यांनी तक्रार अर्ज दिला असुन या तक्रारी अर्जानुसार, हवेली तालुक्यातील आळंदी म्हातोबाची ग्रामपंचायत हद्दीतील चोरघे वस्ती परिसरात त्यांच्या घराशेजारी असलेल्या पोल्ट्री शेडमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर माश्या व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबातील लहान मुले व वयोवृद्ध व्यक्तींना वारंवार आजारांना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तक्रारीत पुढे म्हटले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पोल्ट्री फार्मधारकांना योग्य त्या सूचना द्याव्यात व माश्या-डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. अन्यथा सदर त्रास कायम राहिल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, तज्ज्ञांच्या मते पोल्ट्री फार्ममधून उत्सर्जित होणारा अमोनिया वायू, सूक्ष्म धूळ तसेच कोंबड्यांच्या विष्ठेमुळे हवेची गुणवत्ता खालावते. यामुळे दमा, खोकला, ब्रॉंकायटिस यांसारखे श्वसनाचे आजार होण्याचा धोका वाढतो. तसेच १ ते १.५ किलोमीटर परिसरातील नागरिकांमध्ये न्यूमोनियाचा धोका अधिक असल्याचेही संशोधनातून स्पष्ट झाले आहे. बर्ड फ्लू सारख्या संसर्गजन्य आजारांचा प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय, ओल्या विष्ठेमुळे माश्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होऊन कॉलरा, गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होतो. दुर्गंधीमुळे डोकेदुखी व मळमळ यांसारख्या तक्रारीही वाढतात. पावसाळ्यात टाकाऊ पदार्थ पाण्यात मिसळल्यास विहिरी व इतर पाण्याचे स्रोत दूषित होण्याचा धोका संभवतो. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांनुसार पोल्ट्री फार्म निवासी वस्तीपासून दूर असणे तसेच स्वच्छतेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. मात्र, या प्रकरणात नियमांकडे दुर्लक्ष झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# रमाईंचा त्याग आणि समर्पणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामागची खरी ताकद

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले : त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे पिंपरीत भूमिपूजन संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर या संघर्ष, त्याग आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या महान कार्याला खंबीर साथ दिली. बाबासाहेबांनी देशाला विचार, संविधान आणि स्वाभिमान दिला, पण त्या विचारांना उभं राहण्यासाठी जी शांत, निःस्वार्थ ताकद लागते, ती रमाईंच्या रूपाने त्यांच्या पाठीशी होती. म्हणूनच पिंपरी येथे उभारण्यात येणारे माता रमाईंचे स्मारक म्हणजे केवळ एक वास्तू नसून त्याग, स्त्रीशक्ती आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचे प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) लगतच्या मोकळ्या जागेत उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे होते.

भूमिपूजन सोहळ्यास आमदार महेश लांडगे, उमा खापरे, शंकर जगताप, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, माजी मंत्री विजय गिरकर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य योगेश बहल, डॉ. वैशाली घोडेकर, शंकुतला धराडे, नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासुळकर, राहुल भोसले, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, डॉ. सुहास कांबळे, धर्मपाल तंतरपाळे, कुणाल व्हावळकर, बाबासाहेब त्रिभुवन, कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, सारिका गायकवाड, निकिता कदम, सोनम मोरे, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, तृप्ती कांबळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, अर्चना सस्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, मारुती भापकर, अंकुश कानडी, माजी नगरसदस्या चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह पुणे महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसदस्य निलेश आल्हाट तसेच सहशहर अभियंता मनोज सेठिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेली चळवळ ही केवळ एका घटकापुरती मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीसाठीची होती, असे सांगत त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव केला.

" डॉ. बाबासाहेब नसते तर आम्हाला आज मुक्तपणे बोलण्याचाही अधिकार मिळाला नसता," असे ते म्हणाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत, शाळेच्या बाहेर बसून ज्ञान मिळवणाऱ्या बाबासाहेबांनी पुढे देशाला संविधान देत समानतेचा पाया रचला, ही बाब आजच्या व भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

बाबासाहेबांच्या आयुष्यातील संघर्षमय वाटचालीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले, त्यांनी कधीही पैशाला प्राधान्य दिले नाही, तर ज्ञान, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांसाठी आयुष्य अर्पण केले. त्यांच्या या प्रवासात त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांचे मोलाचे योगदान होते.

"अत्यंत हालअपेष्टा सहन करत माता रमाईंनी बाबासाहेबांच्या कार्याला ताकदीने साथ दिली. त्यांचा त्याग आणि समर्पण हीच खरी प्रेरणा आहे," असेही ते म्हणाले. तसेच आज समाजात शिक्षण, समानता आणि स्वाभिमानाचे जे वातावरण निर्माण झाले आहे, ते डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामुळेच शक्य झाले आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. "आज कोणत्याही शाळेतून आम्हाला बाहेर काढण्याची कुणाचीही हिम्मत नाही, ही आमच्या पाठीशी असलेली डॉ. बाबासाहेबांची ताकद आहे," असे ठामपणे त्यांनी अधोरेखित केले.

पिंपरी चिंचवड येथे उभारण्यात येणारे माता रमाईंचे स्मारक देशातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी या प्रकल्पाच्या उभारणीसाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले. "हा लढा दीर्घ होता, मात्र शेवटी त्याला यश मिळाले आहे," असे सांगत त्यांनी स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी इच्छुक असून त्याही कार्यक्रमास मी उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.

## मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र 5 जानेवारी 2025 पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांच्या कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील 47 प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण 60 स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते.

## वन स्टॉप सेंटर : पीडित महिलांच्या हक्काचे माहेरघर

■ अमरावतीत एका वर्षात १९६ महिलांना मदतीचा हात




संकटग्रस्त महिलांना एकाच छताखाली सर्व प्रकारची मदत मिळावी या उद्देशाने केंद्र पुरस्कृत 'मिशन शक्ती' योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'वन स्टॉप सेंटर' (OSC) प्रभावीपणे कार्यरत आहे. महिला व बाल विकास मंत्रालय आणि जिल्हा महिला व बाल विकास विभाग, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गेल्या एका वर्षात तब्बल १९६ पीडित महिलांना विविध प्रकारची मदत व आधार देण्यात आला आहे.

**सर्वंकष सुविधा 'एकाच छताखाली'** : कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, महिला तस्करी, ॲसिड हल्ला किंवा कोणत्याही प्रकारच्या मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जाणाऱ्या महिलांसाठी हे केंद्र म्हणजे एक सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहे. येथे पीडित महिलांना न्याय, सुरक्षा, कायदेशीर मदत, पोलीस मदत, समुपदेशन, वैद्यकीय सहाय्य आणि तात्पुरता निवारा अशा सर्व सुविधा विनाविलंब उपलब्ध करून दिल्या जातात.

वन स्टॉप सेंटरचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या पीडित महिलेचे वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती याचा विचार न करता तिला तत्काळ आधार दिला जातो. अमरावती येथे सन २०१७ पासून हे केंद्र अविरतपणे सेवा देत असून, हिंसाचाराने बाधित झालेल्या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी हे केंद्र कटिबद्ध आहे.


**२४ तास अखंड सेवा आणि संपर्क** : संकटग्रस्त महिलांसाठी ही सेवा २४ तास सुरू असते. जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अमरावती येथे हे केंद्र स्थित असून, मदतीसाठी ९३७१७०८५३५ किंवा ७७२०८८४१९८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. तसेच, हिंसाचाराने पीडित महिला १८१ या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करून कधीही मदत मिळवू शकतात.

समाजात कोठेही पीडित महिला आढळल्यास त्यांना या केंद्राचा लाभ मिळवून देण्यासाठी पोलीस विभाग, सामाजिक संस्था, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका मदत करतात. पीडित महिलांसाठी वन स्टॉप सेंटर म्हणजे हक्काचे माहेरघरच आहे!

**अपर्णा यावलकर**
**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**अमरावती**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.



तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले. तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# पुरंदरवासीय टोल भरणारच नाहीत, आंदोलकांची भूमिका कायम

## टोल कंपनीची मनमानी? अपूर्ण कामांवरही वसुली, नागरिक आक्रमक



जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील बेलसर टोल नाक्यावरून पुन्हा एकदा संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी थेट टोलविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे चित्र समोर आले आहे. सासवड येथील नवीन प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या बैठकीत नागरिक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात चांगलाच खडाजंगी वाद रंगला. अपूर्ण कामांवर टोल सुरू केल्याचा आरोप करत संतप्त नागरिकांनी टोल बंद करण्याची ठाम मागणी केली. आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील बेलसर फाटा जवळ टोल नाका सुरू करण्यात आला असून पुरंदर तालुक्यातील सर्व रहिवाश्यांना हा टोल रद्द करावा यासाठी आंदोलन सुरू असून बुधवार दिनांक 29 रोजी सासवड येथे आंदोलक व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी राम लठाड उपस्थित होते. त्यांच्या समोरच नागरिकांनी प्रलंबित कामांचा पाढा वाचत प्रशासनाला धारेवर धरले. विशेष म्हणजे, संबंधित रस्ता पूर्ण झालेला नसताना टोल वसुली सुरू करण्यात आली आहे, ही बाब नागरिकांच्या रोषाचे मुख्य कारण ठरली. शासनाच्या नियमांनुसार किमान 75 टक्के काम पूर्ण झाल्याशिवाय टोल आकारणी सुरू करता येत नाही, असा मुद्दा आंदोलकांनी ठामपणे मांडला.

बैठकीदरम्यान अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या. रस्त्याच्या दुभाजकांवर अद्यापही विद्युत रोषणाईची व्यवस्था करण्यात आलेली नाही. रात्रीच्या वेळी हा मार्ग धोकादायक बनत असल्याचे नागरिकांनी सांगितले. वाल्हे परिसरातील रस्ता केवळ 30 मीटर रुंदीचा करण्यात आला असून तो किमान 45 मीटर असणे अपेक्षित असल्याचीही तक्रार करण्यात आली. नीरावासीयांना राष्ट्रीय महामार्गाला यायचे झाल्यास उलटे वळण ठेवले आहे ,अनेक ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे . बहुतांश ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग चुकीचा आहे .तक्रारवाडी फाट्याजवळ झालेला टोलप्लाझा हा सुद्धा सदोष आहे. सुट्टीच्या व जेजुरीच्या यात्रा उत्सवात मोठी वाहतूक कोंडी टोलप्लाझावर होत असते, याशिवाय दिवेघाटासह अनेक ठिकाणी कामे अपूर्ण असूनही टोल वसुली सुरू केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या सर्व मुद्द्यांवरून बैठकीत वातावरण चांगलेच तापले. पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत सांगितले की, "जोपर्यंत महा मार्ग प्राधिकरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ठोस तोडगा निघत नाही, तोपर्यंत पुरंदर तालुक्यातील नागरिकांकडून टोल वसूल करू नये. स्थानिक नागरिकांना आधार कार्ड दाखवून टोलमधून सवलत देण्यात यावी. त्यांच्या या भूमिकेला बैठकीत मोठा प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी यावेळी आक्रमक भूमिका घेत टोल कंपनीच्या कामकाजावरही गंभीर आरोप केले. टोल नाक्यावर कार्यरत कर्मचारी वाहनचालकांशी उद्धट आणि मजुरी पद्धतीने वागत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्या. अनेक वाहनचालकांना विनाकारण अडवणे, वाद घालणे आणि दबाव टाकणे असे प्रकार घडत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

दरम्यान, बैठकीत एक वेगळाच वाद निर्माण झाला. टोल कंपनीचे कर्मचारी दिलीप कुमार ठाकरे पाटील यांनी अचानक गाई पाळण्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केल्याने वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले. आधीच संतप्त असलेल्या नागरिकांनी या मुद्द्यावर तीव्र प्रतिक्रिया दिली आणि बैठकीचा सूर अधिकच आक्रमक झाला.

या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी सभापती अतुल म्हस्के, शिवसेनेचे दादा थोपटे, धीरज जगताप, मनसेचे तालुकाध्यक्ष उमेश जगताप, जेजुरी शहराध्यक्ष गणेश कुंभार, दादा फाऊंडेशनचे यशवंत दोडके, शिवराज झगडे, राष्ट्रवादीचे रमेश लेंडे

वाल्हे येथील विकास पवार, विजय पवार, पुरंदर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कामठे, साकुर्डेचे बाळासाहेब काळे, जेजुरी नगरपरिषदेचे नगरसेवक योगेश जगताप, दादा उबाळे, गणेश होले, यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपापली भूमिका मांडली. वाल्हे, खळद, साकुर्डे, जेजुरी, नीरा, पिंगोरी, बेलसर, निळुंज, वाळुंज, नावळी, दौडज, गुळुंचे या गावांमधील नागरिक आणि आजी-माजी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत अपूर्ण कामांवर टोल आकारणी हा सरळसरळ अन्याय आहे आणि तो तात्काळ थांबवला पाहिजे. नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर भविष्यात मोठे आंदोलन छेडण्यात येईल.या सर्व घडामोडींमुळे बेलसर टोल नाका पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एकीकडे प्रशासन नियमांचे पालन होत असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे नागरिक प्रत्यक्ष परिस्थिती दाखवत प्रशासनाला आव्हान देत आहेत. त्यामुळे येत्या काळात हा प्रश्न अधिकच चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या तरी या प्रकरणावर कोणताही अंतिम निर्णय झालेला नसून, पुढील बैठकीत यावर तोडगा निघतो का, याकडे संपूर्ण पुरंदर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### उष्णतेच्या लाटेपासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

पुणे (दैनिक संध्या) : सध्या राज्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्णतेची लाट (Heat Wave) निर्माण होण्याची शक्यता असून पशुधनाच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. पशुधनामध्ये उष्माघात, दूध उत्पादनात घट, भूक मंदावणे, निर्जलीकरण तसेच मृत्यूचा धोका निर्माण होऊ शकतो. त्याअनुषंगाने पशुधन संरक्षणासाठी पशुपालकांनी करावयाच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे. जनावरांना दिवसभर मुबलक प्रमाणात स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. पाण्याच्या टाक्या व पाणवठे स्वच्छ ठेवावेत. शक्य असल्यास पाण्यात इलेक्ट्रोलाइट / खनिज मिश्रणाचा वापर करावा. सावलीची व्यवस्था जनावरांना थेट उन्हात बांधू नये. गोठ्यांवर शेडनेट, गवताचे आच्छादन किंवा ताडपत्रीचा वापर करावा. गोठ्यामध्ये पुरेशी हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. आहार व्यवस्थापन सकाळी लवकर व सायंकाळी उशिरा हिरवा व पौष्टिक चारा द्यावा. दुपारच्या कडक उन्हात खाद्य देणे टाळावे. खनिज मिश्रण व मीठाचा संतुलित वापर करावा. जनावरांना थंडावा देणे- दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर पाणी शिंपडावे. शक्य असल्यास पंखे किंवा फॉगर्सचा वापर करावा. म्हैस व इतर जनावरांना पाण्यात बसण्याची व्यवस्था असल्यास अधिक चांगले. दुपारी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत जनावरांची वाहतूक टाळावी. बाजार, स्पर्धा किंवा लांब अंतराच्या हालचाली शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी कराव्यात. धाप लागणे, जास्त लाळ येणे, शरीराचे तापमान वाढणे, सुस्ती व अशक्तपणा, खाद्य व पाणी कमी घेणे आदि लक्षणे आढळल्यास तात्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा कुक्कुटपालनासाठी विशेष काळजी- शेडमध्ये पुरेसे वायुवीजन ठेवावे. स्वच्छ व थंड पाणी सतत उपलब्ध ठेवावे. गर्दी टाळावी व इलेक्ट्रोलाइटचा वापर करावा. उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेचा विचार करता सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची योग्य काळजी घ्यावी व वरील उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.असे आवाहन सहायक आयुक्त, डॉ. विष्णू गर्जे यांनी केले आहे.

### फार्मर आयडी नोंदणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला असून अद्यापही ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडीची नोंदणी केली नाही त्यांनी २० मे २०२६ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. राज्यात ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. राज्यामध्ये एकूण १.७१ कोटी खातेदार असून यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलेले आहेत. फार्मर आयडी नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर किंवा स्वतःही ॲग्रीस्टॅक पोर्टलवरून ऑनलाइन नोंदणी करावी. फार्मर आयडी नोंदणी संदर्भात कोणतीही अडचण असल्यास पुणे विभागातील शेतकऱ्यांनी सहायक कृषी अधिकारी श्रीमती संगीता ननावरे यांच्याशी ७५८८५०९४९२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### यशदा कडून शहर पथविक्रेता समिती सदस्य व अतिक्रमण निरीक्षक यांना प्रशिक्षण

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागा मार्फत "पथविक्रेता (उपजीविका) संरक्षण व पथविक्री विनिमय अधिनियम २०१४" या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी संपदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये शहर पाठविक्रेता समितीचे सदस्य आणि महानगरपालिकेतील संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी अशा एकूण ४० प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर प्रशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट पथविक्रेता कायदा २०१४ अंतर्गत तरतुदी, अंमलबजावणी प्रक्रिया, पथविक्रेत्यांचे हक्क व स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी याबाबत सखोल माहिती देणे हे होते. कार्यशाळेदरम्यान पथविक्रेता अधिनियम २०१४ या मुख्य विषयासोबतच नगर प्रशासनातील संवाद कौशल्ये, आरोग्य धनसंपदा तसेच मनाची अमर्याद शक्ती या विषयांवरही प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना कायदेशीर, प्रशासकीय तसेच वैयक्तिक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त माहिती मिळाली. या प्रशिक्षण कार्यशाळेसाठी श्री. राजीव नंदकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा संचालक, राज्य नागरी विकास संस्था, यशदा यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले व प्रशिक्षणार्थ्यांना पथविक्रेता अधिनियम २०१४ आणि पथविक्रेता नियम २०१६ बाबत मार्गदर्शन केले.त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थ्यांना पथविक्रेता कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात व्यावहारिक व उपयुक्त माहिती प्राप्त झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सचिन कलंत्रे (भा.प्र.से.), उपमहासंचालक तथा निबंधक, यशदा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी यशदा व पुणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वय साधला.

# भरदिवसा घरफोडी करणाऱ्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या




नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सावरगाव येथे राहणाऱ्या कल्पना बाजीराव राजगुरू (वय 62 वर्ष) या दुपारच्या वेळी घरी असताना एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले होते.तसेच त्यांना जबर मारहाण करून त्यांच्या तोंडात दगड दाबून चार दात पाडले होते. त्यावरून जुन्नर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. या वयोवृद्ध महिलेसोबत झालेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी सदर गुन्ह्याचा लवकरात लवकर तपास करून आरोपींना अटक करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या.सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास करत असताना सावरगाव जुन्नर येथील घटनास्थळाच्या आजूबाजूला सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता एक संशयित इसम मोटरसायकलवर जाताना दिसून आला. पण थोडा पुढे नारायणगावच्या बाजूला गेल्यानंतर आरोपीने गुन्हा करतेवेळी घातलेली कपडे बदलून पोलिसांना चकवा देण्यासाठी दुसरी कपडे परिधान केली. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळापासून त्या संशयित इसमाचा मागोवा काढत भोसरीपर्यंत CCTV फुटेज प्राप्त केले. मिळालेले सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयती इसमाचे तसेच गाडीची गोपनीयबातमीदारामार्फत माहिती घेतली असता सदर संशयित इसम हा रवींद्र गणपत राजगुरू (वय ५४ सध्या राहणार भोसरी, पिंपरी चिंचवड मूळ राहणार सावरगाव तालुका जुन्नर जिल्हा पुणे )येथील असल्याचे समजले. दिनांक २८/४/२०२६ रोजी संशयित इसम हा घोडेगाव फाटा जुन्नर येथे येणार असल्याचे गोपनीय बातमीदारामार्फत समजल्याने सदर ठिकाणी सापळा लावून संशयित इसमास गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव रवींद्र गणपत राजगुरू वय, ५४ रा.अक्षय नगर,भोसरी, पिंपरी चिंचवड मूळ राहणार सावरगाव ता. जुन्नर जि. पुणे असे सांगितले. पुढील तपास पोलीस सबइन्स्पेक्टर रघुनाथ शिंदे करत आहेत.

सदरची कार्यवाही ही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे,उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर ,पोलीस निरीक्षक किरण अवचर,सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,सहाय्यक फौजदार दीपक साबळे,पोलीस हवालदार राजू मोमीन, पोलीस हवालदार संदीप वारे, पोलीस शिपाई अक्षय नवले, पोलीस शिपाई अभिमन्यू मोटे यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे ही काळाची गरज

पुणे (दै. संध्या)

■ प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे मत

आजच्या शिक्षण व्यवस्थेसमोर शिक्षणाचा हक्क, योग्य शिक्षण आणि योग्य पद्धतीने दिले जाणारे शिक्षण या तीन महत्त्वाच्या संकल्पना आहेत. गुगलच्या युगात नवीन पिढीतील शिक्षक कसे घडवायचे, हा मोठा प्रश्न असून शिक्षकांनी केवळ माहिती देणारे न राहता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे बनणे आवश्यक आहे. स्टार्टअप संस्कृतीच्या संदर्भात देशासमोरील खरी समस्या अर्थसंकल्पीय तूट नसून विश्वासाची कमतरता आहे. हा विश्वास केवळ समाजातच नव्हे, तर कुटुंबातही निर्माण होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास असणे अत्यंत आवश्यक असून, तरुण पिढीमध्ये विश्वास निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचेही मत प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले. शिक्षण प्रसारक मंडळी च्या वतीने 'भविष्य घडवण्यासाठी सहनिर्मिती' या संकल्पनेवर आधारित नेतृत्व विकास या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या लेडी रमाबाई सभागृहात करण्यात आले होते. डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी बदलत्या काळात नेतृत्वाची भूमिका आणि नवोन्मेषाची गरज यावर उपस्थित यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तर सत्रही पार पडले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके, उपाध्यक्ष गजेंद्र पवार, नियामक मंडळ अध्यक्ष सुधीर काळकर आदि उपस्थित होते. यानंतर सुधीर काळकर, गजेंद्र पवार आणि ॲड. सदानंद फडके यांनी शिक्षण, व्यवस्थापन आणि नेतृत्व विकास यामधील आव्हाने व संधी यावर मार्गदर्शन केले. डॉ. उदय साळुंखे यांचे 'घातांकीय भविष्याची निर्मिती व विकासवादी दृष्टीकोनाची भूमिका' या विषयावर व्याख्यान झाले.

# सोशल मीडियावरील जूने प्रेम परत मिळवून देण्याचे आमिष दाखवून छळ

कोळवण (दै. संध्या)

सोशल मीडियावरील फसवणूक आणि मानसिक छळामुळे एका तरुणीने जीवन संपविल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकरणी पौड पोलिसांनी तत्पर तपास करत राजस्थानमधून दोन आरोपींना अटक केली आहे. मृत तरुणी रेणुका लिखिते (वय-२५, रा. चिन्मय विभूती आश्रम, कोळवण, ता. मुळशी) ही एम.ए. (बासरी वादन) शिक्षण घेत होती. ती आश्रमातील महिला वसतिगृहात राहत होती. दि. ६ एप्रिल २०२६ रोजी तिने आपल्या राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आढळून आले. तिचे आई-वडील इंदोर (मध्य प्रदेश) येथे वास्तव्यास आहेत. घटनेची माहिती मिळताच पौड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. सुरुवातीला आत्महत्येचे कारण स्पष्ट नव्हते; मात्र तांत्रिक तपास आणि मोबाईल विश्लेषणातून या प्रकरणामागे सोशल मीडियावरील फसवणूक असल्याचे उघड झाले. तपासात निष्पन्न झाले की, काही अनोळखी व्यक्तींनी इंस्टाग्रामद्वारे रेणुकाशी संपर्क साधून 'तुझे जुने प्रेम परत मिळवून देतो' असे आमिष दाखवले.

# 'एक्झिट २०२६' प्रदर्शनात नाविन्यपूर्ण वास्तु प्रकल्प सादर

पुणे (दै. संध्या)

■ विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरतर्फे आयोजन




'ऑटिझम केअर अँड डेव्हलपमेंट सेंटर' या प्रकल्पातून पुण्यात विशेष मुलांसाठी शिक्षण व निवासी सुविधा असलेले केंद्र उभारण्याची संकल्पना... पारंपरिक शिक्षणपद्धतीला पर्याय देणाऱ्या शाळा... अकोले तालुक्यात पर्यटनाच्या माध्यमातून कौशल्य विकास व आर्थिक सक्षमीकरण... कृषीसेतू... सहजीवनाच्या संकल्पनेवर आधारित वास्तुरचना... हेरिटेज लिंक, वाई असे विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प 'एक्झिट २०२६' या वास्तु प्रकल्प प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केले. विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या वतीने फायनल थेसिस ज्युरी २०२६ आणि 'एक्झिट २०२६' या विद्यार्थ्यांच्या वास्तु प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पिरंगुट येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात हे प्रदर्शन पार पडले. विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यासाठी पुणे व मुंबई येथील १२ नामांकित वास्तुरचनाकारांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प परीक्षकांसमोर सादर केले. कार्यक्रमात कॉलेज चे प्राध्यापक अणि विद्यार्थी उपस्थित होते.

'एक्झिट २०२६' प्रदर्शनामध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या अभ्यासक्रमातील निवडक कामे क्युरेटेड पॅनेल्सच्या माध्यमातून सादर केली. प्रदर्शनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी अनेक प्रख्यात वास्तुविशारदांच्या कार्यालयांनी भेट दिली. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांची त्यांच्या कार्यालयात काम करण्यासाठी निवड करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मौल्यवान अनुभव आणि शिकण्याची उत्तम संधी मिळाली.

# महाराष्ट्रदिनी प्रदेश युवक काँग्रेसतर्फे पुण्यात 'लोकशाही संवाद'

## डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश व रोहित वेमुला विचार अभियानाचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)



डॉ. नरेंद्र दाभोलकर | गोविंद पानसरे | एम. एम. कलबुर्गी | गौरी लंकेश | रोहित वेमुला

महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने समाजातील बदलत्या वैचारिक, सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानांना उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे 'लोकशाही संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश व रोहित वेमुला यांच्या नावाने पाच विचार अभियानाचे उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे. युवकांना समाजपरिवर्तनाच्या केंद्रस्थानी ठेवत विचार, संवाद आणि कृती यांची नवी दिशा देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

येत्या शुक्रवारी (ता. १ मे) सायंकाळी ५ वाजता पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनीष शर्मा, ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी, विधिज्ञ ॲड. असीम सरोदे, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पानसरे व हमीद दाभोलकर यांची या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लाभणार असून, विविध समकालीन विषयांवर त्यांचे मार्गदर्शन युवकांना प्रेरणादायी ठरणार आहे, अशी माहिती युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी दिली.

शिवराज मोरे म्हणाले, "अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक विचारांविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी 'डॉ. नरेंद्र दाभोलकर अभियान', सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि समतेचा विचार समाजात अधिक दृढ करण्यासाठी 'गोविंद पानसरे अभियान', विचारस्वातंत्र्य, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि अभिव्यक्तीचा अधिकार अधिक बळकट करण्यासाठी 'एम. एम. कलबुर्गी अभियान', सत्याधारित पत्रकारिता, मीडिया साक्षरता आणि फेक न्यूजविरोधातील जनजागृतीसाठी 'गौरी लंकेश अभियान' व विद्यार्थी सन्मान, शिक्षणातील समानता आणि सामाजिक समावेशकतेचा संदेश देण्यासाठी 'रोहित वेमुला अभियान' हाती घेण्यात आले असून, या पाचही अभियानाचा संयुक्त उद्घाटन सोहळा यावेळी होणार आहे."

ही अभियाने केवळ उद्घोषणांपुरती मर्यादित न राहता राज्यभरातील शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भाग, शहरी वस्त्या आणि युवक संघटनांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. चर्चासत्रे, संवाद मालिका, प्रशिक्षण कार्यशाळा, सामाजिक जनजागृती मोहिमा आणि युवक नेतृत्व विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. युवकांनी विवेक, विज्ञान, समता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारावर नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीत सक्रिय भूमिका घ्यावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. राज्यात वैचारिक प्रगल्भता, सामाजिक सलोखा आणि युवकांमध्ये संविधाननिष्ठ नेतृत्व निर्माण करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक प्रभावी पाऊल ठरेल."

"आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात अंधश्रद्धा, समाजातील वाढते ध्रुवीकरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्माण होणारे प्रश्न, शिक्षणातील विषमता आणि फेक न्यूजच्या माध्यमातून होणारी दिशाभूल ही गंभीर आव्हाने समाजासमोर उभी आहेत. या पार्श्वभूमीवर युवकांनी केवळ प्रेक्षक न राहता विचारांचे वाहक, परिवर्तनाचे नेतृत्व आणि समाजजागृतीचे माध्यम बनावे, या व्यापक उद्देशाने या उपक्रमाची संकल्पना आकाराला आली आहे," असेही त्यांनी नमूद केले.